म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 833

# आनंदाची मूर्ति इ०

REFBK-0003732
REFBK-0003732

वि० रा० भिडे

# आनंदाची मूर्ति इ०

ब्यांयशी पदांचा संग्रह

REFBK-0003732

विद्याधर वामन भिडे

मुद्रक आणि प्रकाशक
शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

इ० स० १९२८

८३३
काव्य ८३३
३७३२

किंमत बारा आणे

A

CONCISE

SANSKRIT-ENGLISH

# DICTIONARY

By Mr. V. V. BHIDE

It supplies the student with all the necessary information that he usually requires.

The dictionary gives short definitions of all important figures of speech, technical terms of aesthetics, mathematics, astronomy, logic, philosophy, ritual ceremony, and many other branches of knowledge.

This Dictionary has three appendices.

The first appendix gives short accounts of important mythological personages. The second appendix gives the names of sanskrit metres with their schemes and scansions. The third appendix is a map of ancient India giving the ancient names of the provinces into which India was then divided.

This Dictionary covers 1232 pages of Demi 8 vo size and we offer it at only Rs. 4.

Apply to the manager, ' Chitrashala Press 1026 Sadashiv peth Poona City.

काव्य नं. 233
ता.
आ. ले.

# आमचा संकल्प

भिन्न भिन्न मासिकांत भिन्न भिन्न वेळीं छापून आलेलीं अशीं, आणि आजपर्यंत कोठेंच न छापलेलीं अशीं आमचीं कांहीं निवडक काव्यें आम्हीं सहा भागांत छापून काढण्याचा विचार केला आहे. प्रत्येक भाग सुमारें शंभर पासून सवाशें पृष्ठांचा होईल आणि प्रत्येक भागाची किंमत आगाऊ नांवें नोंदवून साही भाग घेणाऱ्यांना आठ आणे ठेवावयाची आहे. इतरांना प्रत्येक भागाच्या पृष्ठसंख्येप्रमाणें जी किंमत आम्हीं ठरवूं ती द्यावी लागेल.

पहिल्या तीन भागांत मिळून सुमारें सत्तर काव्यें पौराणिक, ऐतिहासिक, तात्त्विक, बोधपर, विनोदी, अशा विविध स्वरूपांचीं संकलित केलीं जातील.

चवथ्या भागांत " जीवजागृति " हें काव्य येईल. ह्या काव्यांत अडीचशेंहून अधिक विषयांवर आमचे स्फुट विचार ग्रथित केले आहेत. ह्या काव्यांत विषयांची विविधता आहे तशी वृत्तांचीही विविधता आहे. कारण, यांत सुमारें एकशें साठ गणवृत्तें आम्हीं उपयोगांत आणलीं आहेत.

पांचव्या भागांत " राघवीयपरीवाह " ह्या काव्याचा उत्तरार्ध ( सर्ग ११ ते २२) येणार आहे. ह्या उत्तरार्धांत रावणानें सीता चोरून नेली, येथपासून तों रामाला राज्याभिषेक झाला, येथपर्यंतची रामायणाची कथा ग्रथित केली आहे.

सहाव्या भागांत आमचीं विविध विषयांवर रचलेलीं व्यांयशी पदें आम्हीं संकलित करणार आहों.

महाराष्ट्रीयांनीं आमच्या ह्या सहा भागांस आश्रय द्यावा अशी विनंति आहे. भाग छापून तयार होतील त्या क्रमानें ते ग्राहकांकडे पाठविण्यांत येतील. ते ग्राहकांनीं आठ आठ आणे किंमत देऊन स्वीकारावे, अशी विनंति आहे. कोणाला आपल्या मित्रांसाठीं आमच्या काव्यांचे भाग पाहिजे असल्यास तसें त्यांनीं आह्माला कळविण्याची कृपा करावी.

७३५ सदाशिव पेठ,
पुणें सिटी

विद्याधर वामन भिडे

# प्रस्तावना

आमच्या संकल्पाप्रमाणें आतांपर्यंत आम्ही आमच्या काव्यांचे पांच भाग महाराष्ट्रीयांना सादर केले. ( १ ) **मंदार मंजरी इ०**, ( २ ) **गजेन्द्रमोक्ष इ०**, ( ३ ) **रथरूपक इ०**, ( ४ ) **जीवजागृति** ( ५ ), **राघवीय-परीवाह, उत्तरार्ध**, हे ते पांच भाग होत. आतां सहावा म्हणजे शेवटचा भाग **आनंदाची मूर्ति इ०** हा ब्यांयशी पदांचा संग्रह आम्ही वाचकांना सादर करीत आहों.

ह्या संग्रहांतलि पदें अनेक चालींवर आणि अनेक विषयांवर आहेत. निसर्गाचे देखावे, जगाची राहाटी, देशाची स्थिति, आपलीं कर्तव्यें, ह्यांवर आणि तात्त्विक सामाजिक, नैतिक अशा विषयांवर आमचे विचार आलेले आहेत. पदांच्या चालीही अनेक आहेत.

ह्या ब्यांयशी पदांपैकीं बहुतेक पदें १९०६ ते १९०९ पर्यंत आम्ही रचिलीं, तीं त्याचवेळीं अनेक मासिकांत छापून आलीं होतीं. सुमारें दहा बारा पदें १९२५ ते १९२८ ह्या सालीं आम्ही रचिलीं. हीं सर्व पदें ह्या सहाव्या भागांत आम्ही संकलित केली आहेत. शेवटचीं दोन पदें आमच्या पत्नीचीं आहेत.

ह्या ब्यांयशी पदांचा अनुक्रम रचनाकालावर, प्रकाशनकावर, किं० विषयांच्या वर्गीकरणावर उभारलेला नाहीं. ह्या संग्रहांतील पदांतील विचार कोणास आक्षेपार्ह वाटणार नाहींत अशी आम्हांला उमेद आहे.

आम्ही आजपर्यंत जी कविता केली तिच्यांतील निवडक अंश संकलित करून आमच्या संकल्पाप्रमाणें आम्ही महाराष्ट्रीयांना सहा भागांत सादर केला आहे तो त्यांना रुचला तर आम्हाला आनंद होईल.

पुणें
७३५ सदाशिव पेठ,
तारीख १५ सप्टेंबर १९२८

**विद्याधर वामन भिडे**

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ आनंदाची मूर्ति | १ |
| २ अघाला थारा देऊं नका | २ |
| ३ अंत्यजांना दूर ठेवूं नका | २ |
| ४ अंधळा मुलगा | २ |
| ५ अधिकाराचा उपयोग | ३ |
| ६ आपला धर्म सोडूं नका | ३ |
| ७ आर्यमहीतें भजा | ४ |
| ८ आळस | ४ |
| ९ उच्च पदावर उच्च नीति नसते | ४ |
| १० उच्चपदीं जो खल बसला | ५ |
| ११ एक अनाथ गाय | ६ |
| १२ एका स्थविराचें स्वगत भाषण | ७ |
| १३ स्थिर कर्तव्य करा | ८ |
| १४ कर्तव्याचा मार्ग | ९ |
| १५ कविता करीत असतां | ९ |
| १६ काळाचें भय | १० |
| १७ कुजनाचा संग | ११ |
| १८ खरा मित्र कोण ? | ११ |
| १९ खरा शास्ता कोण ? | १२ |
| २० खलवृत्ति | १२ |
| २१ खलाचा आचार | १४ |
| २२ खलाचें वर्तन | १५ |
| २३ खलाला जवळ करूं नये | १५ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| २४ खलावर उपकार | १६ |
| २५ चार ऋणें | १६ |
| २६ चिंतूर | १८ |
| २७ जग कोणीकडे चाललें आहे ? | १९ |
| २८ ज्याचा तो | २० |
| २९ ज्याचा धर्म तया | २० |
| ३० झाडाचें सुख | २१ |
| ३१ दहिंवराचें बिंदु | २१ |
| ३२ दास्य | २३ |
| ३३ दिव्याची मागणी | २३ |
| ३४ दे गे! बाई जोगवा | २४ |
| ३५ देशद्रोह आणि देशभक्ति | २५ |
| ३६ देशहित | २५ |
| ३७ धैर्यानें यत्न करा | २६ |
| ३८ निरुपयोगी वस्तु | २६ |
| ३९ परिस्थितीवर सुख अवलंबून नसतें | २७ |
| ४० पावसाळ्यांतील ओढा | २८ |
| ४१ प्रिय असुपरि | २९ |
| ४२ कैकयीप्रत दशरथ | ३० |
| ४३ प्रेम विकत घेतां येत नाहीं | ३१ |
| ४४ फार वेळां निराशा झाल्यानें इच्छाच लोपते | ३२ |

विषय पृष्ठ

४५ फुलाची स्थिति ३३
४६ फूल आणि मूल ३३
४७ बोरी आणि बाभळी ३५
४८ भोगी तो शर्मा ३६
४९ मत्सर ३६
५० माझा देश हा माझा देव ३७
५१ मायभूमीसाठीं झटावें ३७
५२ मृत पुत्राबद्दल शोक ३८
५३ यत्न सोडूं नये ३९
५४ दुःखितांना साहाय्य करा ३९
५५ शांत होइं गा हत हृदया ! ४०
५६ शत्रूंचा उपदेश ४१
५७ मृत पुत्र ४२
५८ शुक्राच्या चांदणीस उद्देशून ४२
५९ शुद्धिगुण ४३
६० शोकरूपी शंकु ४४
६१ सत्यमेव जयते ४५
६२ समर्थांचा झोंडपणा ४७

विषय पृष्ठ

६३ सुकृता जोडावें ४८
६४ सुपथा लागा ४९
६५ सुपथें चाला ४९
६६ सूर्योदय ५०
६७ स्वार्थ आणि देशार्थ ५१
६८ हिंददेशाचा शोक ५२
६९ द्रव्यानें प्रेम मिळत नाहीं ५३
७० जेथें तेथें पैसा वेचा ५४
७१ शेणाचे गोळे ५५
७२ यमा ! उद्धरीं ५५
७३ जलप्रवास ५६
७४ जगाचा उरफाटा न्याय ५७
७५ मातृभूमीच्या सुस्थिती-साठीं झटा ५८
७६ एकान्तसमयींचे विचार ५८
७७ आहे ती स्थिति ५९
७८ पंचपक्वान्नीं जेवण ६०
७९ उपकारशीलता ६०
८० आरशावर चोंच मारणाऱ्या चिमणीस ६२
८१ ताईला बोलवा ६३
८२ आपलें सत्यस्वरूप ६४

सं. कार्या. ८०८
ता. २०-४-२८

# आनंदाची मूर्ति इ०

## १. आनंदाची मूर्ति

ग्रंथालय ठाणे
अ. क्र. 3692

('भाव धरा रे' या चालीवर)

आनंदाची । मूर्ति ही सुखवि नेत्रांस ॥ ध्रु० ॥
मात्रंकीं हें मूल उताणें
दिसतें कैसें गोजिरवाणें,
इहलोकींचें दुःख न जाणे,
मूल असें हें । सुखविना वदा कोणास ॥ १ ॥
काळे विस्तृत तैजस वर तो
निश्चल लावुनि डोळे बघतो
मधें मधें तो उगाच हसतो
कुतुकाधान । बाल हा गमे सर्वांस ॥ २ ॥
हातपाय तो उडवून वरी
जणों मल्लसा व्यायाम करी,
खदखद हासे कारण न तरी,
हा देखावा । कौतुकें भरी हृदयास ॥ ३ ॥
बाल गमे हा शुचितासार,
नरजातीचा सदलंकार,
आनंदाचें पूर्ण अगार,
बाल बघो हा । दुसरिया अशा बाल्यास ॥ ४ ॥

## २. अघाला थारा देऊं नका

( 'जाणीं हरिचे पाय' या चालीवर )

द्या मनिं अघास पळहि न थारा । अघ हरी हर्ष कीं सारा ॥ ध्रु० ॥
षडरि मनांतिल शांतिस हरिती । यास्तव ते वारा ॥ १ ॥
खरेपणाचा पाया घाला । साऱ्या व्यवहारा ॥ २ ॥
विचार जागृत असतां मिळतो । प्रवेश न विकारा ॥ ३ ॥

---

## ३. अंत्यजांना दूर ठेवूं नका

( फटक्याच्या चालीवर )

करी अमंगल धंदा जो नर समाज सुस्थित रहावया ।
घात पात जो न करी, घाली जो न दरवडे, दे न भया ।
सन्मार्गानें चाले, सोडी जो नर केव्हांही न नया ।
तो मज वाटे स्तुत्य खरोखर, मी हितकर्ता गणीं तया ।
देह अमंगल असो, स्वच्छ तो शक्य जलें ये करावया ।
स्नान अंत्यजें करितां होइल शुद्ध तुझा तो शिवावया ।
जगांत असतीं विविध साधनें बाह्य मलातें हरावया ।
सार्वजनीन स्थलीं अंत्यजां कचरूं नका हो ! शिवावया ।
द्विजसम अंत्यज देवाचीं
असतिं मुलें तीं शुचि साचीं
न करा हेटाळणि त्यांची
जनास विद्याधर याची
अंत्यज अपुले बांधव त्यांशीं स्मरा वागतां अहो ! नया ॥ १ ॥

---

## ४. आंधळा मुलगा

( 'बघुनि त्या भयंकर भूता' या चालीवर )

कायशी वस्तु ती आहे जन म्हणे प्रकाश जियेला ।
मज सांगा जन हो ! दावी कोणत्या दृष्टि शोभेला ॥ ध्रु० ॥
जन सकाळ झाली म्हणतो कीं नभांत सूर्य उदेला ।
जन सायंकाळ म्हणे कीं सूर्य अतां अस्ता गेला ॥ १ ॥

मज सकाळ सायंकाळ सारखीच सारी वेळा ।
मज कळे न सूर्य कसा तो भिन्न करी दिवस निशेला ॥ २ ॥
जन म्हणे वसंत धरेला पांघुरवी हिरवा शेला ।
ऋतु मला सारखे सारे, कीं वसंत आला गेला ॥ ३ ॥
मज कळे न हिरवें काळें, मम मनांत रंग न ठेला ।
मज अंध मुलाला सांगा कां प्रकाश विधिनें केला ॥ ४ ॥
हळहळे सर्व जन माझ्या अंधतारूप कुदशेला ।
परि जें न ठाउकें मज तें वाटवी मला न शुचेला ॥ ५ ॥

---

## ५. अधिकाराचा उपयोग

( 'भाग्यें नरतनु साधडली' या चालीवर )

दैवें येतां तुज अधिकार । कांहिं तरी तूं करिं उपकार ॥ध्रु०॥
शुद्ध मनें संतां सेवीं । जनहित जागें मनिं ठेवीं ॥ १ ॥ ध्रु० ॥
लोकीं प्रौढी मिरवाया । वाया झिजवुं नको काया ॥ २ ॥ ध्रु० ॥
दीनावन हें पुण्य महा । तें साधाया कष्ट सहा ॥ ३ ॥ ध्रु० ॥
विद्याधर कवि बोध करी । तो शमदायी चित्तिं धरीं ॥ ४ ॥ ध्रु० ॥

---

## ६. आपला धर्म सोडूं नका

( 'संत दयाळ कसे' या चालीवर )

सोडिल धर्म तया ।
जन हो ! यम लोटी निरया ॥ध्रु० ॥
आपुलिया जें धर्मी निगदित ।
तेंच करी बुध कर्म सदोदित ॥ १ ॥
निजधर्मा जो सोडिल त्याचें
नांवाहि घेती विबुध न वाचें ॥ २ ॥
होइ सुखी जो रत धर्मपथीं ।
हें विद्याधर तत्त्व जनिं कथी ॥ ३ ॥

---

## ७. आर्यमहीतें भजा

आर्यमहीतें भजा । गड्यांनो आर्यमहीतें भजा ॥ ध्रु० ॥
आर्यमहीचें चिंतन भावें । नित्य करावें तद्‌गुण गावे ॥ १ ॥
ती पळवी विपदा इहलोकीं । सौख्यातें ती दे परलोकीं ॥ २ ॥
विद्याधर हें स्थिरशमसाधन । दावितसे तें मान्य करो जन ॥३॥

---

## ८. आळस

( 'घेउनि ये पंखा' या चालीवर )

आळस सोडोनी ज्ञानाच्या प्राप्तीतें करा । ध्रु० ॥
सुलभ नसे विद्या । यास्तव ती मिळवाया
  नेटाची कास धरा । प्राप्तीतें करा ॥ १ ॥
विद्येनें मनुजा । मान मिळे बरवा हो !
  नातरि तो पशुच खरा । प्राप्तीतें करा ॥ २ ॥
विद्येनें येई । अद्भुत शक्ति नराला
  हें न कधीं तुम्हि विसरा । प्राप्तीतें करा ॥ ३ ॥
विद्या मेळवितां । कष्ट जरी बहु झाले
  माघारे तरि न सरा । प्राप्तीतें करा ॥ ४ ॥

---

## ९. उच्चपदावर उच्च नीति नसते

पोवाड्याच्या चालीवर

उच्चपदीं स्थित तो नीतीनें उच्च म्हणो पोर ।
अकिंचनाला नीती करिते थोरांहुनि थोर ॥ १ ॥

कुरूप, सुंदर, दास, स्वामी, षडरि न गणितात ।
सर्व नरांना समानरूपें ते वश करितात ॥ २ ॥

श्रीमंत असो उच्चपदीं वा नर पापी असतो ।
पृथक्‌जनाहुनि उणा अघांश न तच्चित्तीं वसतो ॥ ३ ॥

अंबारीचे स्वामी सारे षड्रिपुचे दास ।
उलटी सुलटी हा न ठाउका भेद मुळीं त्यांस ॥ ४ ॥
चालति षड्रिपु नियंत्रणेनें तोंच शुभावह ते ।
नातरि करविति नरास चाळे संतत ते भलते ॥ ५ ॥
अनंत लक्ष्मी ज्याच्या उच्छ्रित मंदिरिं करि वास ।
कीं भिक्षार्थी, षड्रिपु दोघां करिती निज दास ॥ ६ ॥
गजांतलक्ष्मी ज्यांची ते नर सम षड्रिपुदास ।
हत्ती किंवा पंचा लक्ष्मी देओ हो ! त्यांस ॥ ७ ॥
सधन असो वा अधन असो नर अनघ नसे कोणी ।
वसो उंच तो मंदिरिं किंवा उटजाच्या कोणीं ॥ ८ ॥
विकार सारे सर्व नरांना जोणिति समरूप ।
जिणिजे भूगत कुणबी कांचनमंचकगत भूप ॥ ९ ॥
कामक्रोधप्रभृति रिपूंनीं नर करिजे गाय ।
दुःखें विव्हल होउनि म्हणतो संतत तो हाय ! ॥ १० ॥
विकाराजितनर पापें करितो भय लज्जा त्यजुनी
अधन सधन हीं नुरे भिन्नता, सन्माति होइ सुनी ॥ ११ ॥
अधन सधन नर समरूप अघें विकारवश करिती ।
अधनाची उघडीक होतसे, लोक तया न भिती ॥ १२ ॥
सधना निंदूं धजे न कोणी, घाबरती लोक ।
रत्न जसें चवदावें बघतां घाबरती तोक ॥ १३ ॥

---

## १०. उच्चपदीं जो खल बसला

('त्याचा संग नको मजलागीं' या चालीवर)

उच्चपदावरि जो खल बसला ।
त्याचें बघवे नच मुख मजला ॥ ध्रु० ॥
पातक त्याच्या स्थिरतम चित्तीं ।
दृष्टी संतत त्याची वित्तीं ॥ १ ॥ ध्रु० ॥
दीनांच्या तो मुरगळि मुंड्या ।
पैशानें भरि अपुल्या कुंड्या ॥ २ ॥ ध्रु० ॥

जना म्हणे तो मजला वंदा ।
हाच असो हो ! तुमचा धंदा ॥ ३ ॥ ध्रु० ॥
तुच्छ करी तो नित्य जनास ।
लोकांतें गणि तो निज दास ॥ ४ ॥ ध्रु० ॥
विद्याधर करि उपदेशास ।
टाळा व्यवहारांत खलास ॥ ५ ॥ ध्रु० ॥

---

## ११. एक अनाथ गाय

( 'उद्धवा शांतवन' या चालीवर )

आर्य हो! उद्धरा धेनू नातरी त्यजिल ती प्राण ॥ध्रु०॥

दावितों एक आर्यांनो धेनु मी अनाथ तुम्हांतें ।
धेनु ती तुमाचिया मोठा आणील कंप हृदयातें ।
पंकांत ती पहा धेनू भोगिते कशी कष्टांतें ।
एक खूर उचली वरती
तों तिचे तीन ते खचती
भोगिते कष्ट दुस्सह ती
हात द्या तिजासि ताराया,ती असे फार हैराण ॥आर्य हो!॥१॥
पंकांत रुतुनि ती धेनू भोगिते यातना भारी ।
जाऊनि खूर खोलांत रुतुनि ते राहिले चारी ।
आर्य हो ! या पुढें वेगें ती असे मृत्युच्या द्वारीं ।
सोडिते दीर्घ निश्वास,
कांपते त्यजुनि धैर्यास,
काढिते दीन शब्दास,
हात द्या तिजासि मायेनें त्रात्याची तिजला वाण॥ आर्य हो! ॥२
आपणां प्रेमभावानें देई ती बहुविध भोग्य ।
देउनी आपणां धान्य वाढवी कांति आरोग्य ।
ह्या उपेक्षा न धेनूची आर्यांनो करणें योग्य ।

हीं न धेनु कोणी दुसरी,
जन्मलां तिच्या तुम्हि उदरीं,
हिंदभू चित्त ती विघरी,
या पुडें उद्धरा तीतें घालितों तुम्हां मी आण।। आर्य हो! ।।३।।

---

## १२. एका स्थविराचें स्वगत भाषण

('चंद्रकांत' या चालीवर)

" केश पांढरे होओत तुझे बाळा कापूस ।
यश मेळवुनी धन्य करीं रे! मातेची कूस " ।। १ ।।
हें आशीर्वच गुरुजन माझ्या वाढादिनीं वदले ।
अझुनिहि मत्स्मृतिशिलेवरी तें वच आहे ठरलें ।। २ ।।
शैशव गेलें, बाल्यहि गेलें, तारुण्यहि गेलें ।
प्रौढ वयहि मम जाउनि आतां वार्द्धक्य उदेलें ।। ३ ।।
केश पांढरे झाले, आलें आशीर्वचन फला ।
मद्देहतरू वार्द्धक्यफळें पूर्णपणें नटला ।। ४ ।।
एकामागुनि एक निमाले सारे मम मित्र ।
ज्यांचे चिंतन, भाषण, वर्तन, गंगोद पवित्र ।। ५ ।।
यत्प्रेमा मी विषय असे जन सर्व मरुनि गेले ।
काळकुक्कुटें धान्यकणांपरि ते जन गट केले ।। ६ ।।
जुने मित्र जे मरती त्यांच्या स्थानिं न येति नवे ।
ऐसें वार्द्धक कोणा कैसें सांगा हो ! सहवें ।। ७ ।।
सुखदुःखें जीं अनुभाविलीं मी लांबट संसारीं ।
तीं ज्यां ठावीं अशीं माणसें मृत झालीं सारीं ।। ८ ।।
आतां उरलों मीच एकटा विशाल भूवरती ।
काय होत जन असंख्य जे मज सान्निध वावरती ? ।। ९ ।।
माझ्या जीवा देहा टेंका भार्या गत झाली ।
विद्वत्ता, मति, कल्पकता, मम सुखशांति निमाली ।। १० ।।

भार्या मजला, मी भार्येला, ही जोडी फुटली ।
शांतिसुखाची उर्वरित वयीं आशाही खुटली ॥ ११ ॥
लाखामध्यें एक जन्मली ती लाहुनि भार्या ।
अंतिं एक मी, केश पांढरे, ही स्थिति अनिवार्या ॥ १२ ॥
केश पांढरे झाले माझे गुर्वाशी फळली ।
शांतिसुखा स्थल चित्तिं न दे लव औदासीन्य बली ॥ १३ ॥
संसारांतिल माझीं ज्यांना सुखदुःखें ठावीं ।
ते नुरतां मी काय बोलणीं कोठें बोलावीं ? ॥ १४ ॥
वृद्धाची श्रुति, तरुणाचें मुख, हीं न कधीं जुगतीं ।
तरुणांची श्रुति, वृद्धाचें मुख तम प्रभा गमतीं ॥ १५ ॥
स्थविर प्रकटों कोठें मन मी ? मूक असोनि मुख ।
अशी अवस्था काय कुणाला देउं शकेल सुख ? ॥१६॥
कीर्ति नको जलवीची, वैभव मृगजलसें वाटे ।
द्रव्य मृत्तिका, प्रीतिजलाविण शांतिनदी आटे ॥ १७ ॥
धनामित्रयशें शांतिवांचुनी कणसेंशीं फोल ।
देइ शांतिचिच्छक्तिच गात्रां धनादिकां मोल ॥ १८ ॥
अंबाडीचें दाट माजलें माझ्या शिरिं रान ।
परि मज एकहि तंतु शकेल न पुन्हा करूं लहान ॥ १९ ॥
काला हटवुनि मागें तो करूं शकेल मज बाल ।
जो सरिदुदका प्रतीप जाया शिकविल हो ! चाल ॥ २० ॥
मित्र न उरला, शत्रु न उरला, एकाकी उरलों ।
औदासीन्यशरांकुर माझ्या हृदयीं कां न सलो ? ॥ २१ ॥
अंध अयाष्टिक जगद्वनीं मी, शांतिकडे नेता ।
पथ मज दावुनि कोण माझिया सुख देइल चेता ? ॥ २२ ॥

---

## १३. स्थिर कर्तव्य करा

('जाऊं कामाला' या चालीवर)

स्थिर कर्तव्य करा । सुखाचा पथ कीं तोच खरा ॥ ध्रु० ॥
योग्य तुम्हां जें वाटतसे तें । धैर्यें नित्य करा । गड्यानों ॥ १ ॥

ज्ञानोपार्जनिं धर्माचरणीं । यत्नास न विसरा ॥ गड्यांनो ॥ २ ॥
कर्तव्य करी तोच जगीं नर । मेळवि मान बरा ॥ गड्यांनो ॥ ३ ॥

---

## १४. कर्तव्याचा मार्ग

('अजुनि खुळा हा' या चालीवर)

कर्तव्याचा मार्ग कठिण तरि सुजन न तो सोडितो ॥ ध्रु० ॥
गुरु बोधिति पथ तोच धरोनी, न गुरुवचा मोडितो ॥ १ ॥
त्यागुनि षड्रिपु, सांडुनि कुपथा, खलसंगा तोडितो ॥ ३ ॥
स्वार्थापार्यी देशहितातें कधिंच न तो खंडितो ॥ ३ ॥
विद्याधरवच अनुसरतो तो अमल यशा जोडितो ॥ ४ ॥

---

## १५. कविता करीत असतां

('विकट वाट' या चालीवर)

कवितां करितां कवि चाखी त्या आनंदाला तोड नसे ।
योगी वाटे तो ब्रह्माचें चिंतन करितां जसा बसे ।
एक पंक्ति तो रची श्रमाविण, दुसरीही तो तशी रची ।
परि अंताशीं येतां नडते रचना त्याला बहु वरची ।
यमकास्तव तो धडपड करितो, यमकासाठीं खटपटतो ।
पंक्ती वरची फिरवुनि पाहे तरि यमकाशीं तो अडतो ।
पंक्ति खालची उलटी सुलटी करितो तरि कुंठे अंतीं ।
डोइ खाजवी मिटी लोचनें, लेखनिका चावी दंतीं ।
शिणवी यमकास्तव मति तो
सुलटें ही उलटें करितो
हें काढुनि तो तें भरितो
सरणीं बहुविध तो धरितो
यमक त्यास सुचतां पुरत्या तो रचिल्या पंक्ती करीतसे ॥१॥
असे बुद्धिचे चाळे त्याला कष्टद होति न लवमात्र ।
उलट कष्ट हे त्याला करिती ध्यानसमुद्भवशमपात्र ।

उत्साहें तो पुढच्या पंक्ती रचावयाला सरसावे ।
शब्द विपुल तो जाणे, रचनाप्रकार त्याला बहु ठावे ।
अशा रीतिनें कविता करणें आनंदाचा खेळ असे ।
आनंदहि तो परिणत होतां पुढें लयाची स्थिति विलसे ।
क्षुधा मावळे, तृष्णा लोपे, संसाराची बुद्धि गळे ।
जीवितकार्याचीहि भावना तया सोडुनी दूर पळे ॥
विद्याधर रचनाकाळीं
विसरे खल जीं रचि जाळीं,
मोहक कविसृष्टि निराळी
ती दुःखस्मृति निर्दाळी,
जागृतिनें जी क्लेशद असते शमद होतसे ती रात्र ॥ २ ॥

---

## १६. काळाचें भय

( 'कधिं करिती लग्न माझें' या चालीवर )

वाटावी व्यर्थ भीती मरणाची कां मला ?॥ ध्रु० ॥
मी सदा वंद्य वंदिलें,
पूज्य पूजिलें,
त्याज्य टाळिलें
भिऊं कां काळा । मरणाची इ० ॥ १ ॥
मी सदा शुद्ध अंतरीं
सत्य वैखरी
बोललों तरी
भिऊं कां काळा । मरणाची इ० ॥ २ ॥
षड्रिपू मर्दिलें श्रमें,
आथिलों शमें
सुकृतें मी रमें
भिऊं कां काळा । मरणाची इ० ॥ ३ ॥

---

काव्य नं. ...
ता. ...
आ. के.

## १७. कुजनांचा संग

( 'भाव धरा रे!' या चालीवर )

संग नसावा। कुजनाचा संग नसावा ॥ ध्रु० ॥
पातक कुजनाचें मुख बघणें,
पातक त्यासह भाषण करणें,
पातक त्याची मैत्री धरणें,
संग नसावा इ० ॥ १ ॥
कुजन नीतिचे बंध विसरवी,
कुपथीं गोडी कुजन उपजवी,
मोठीं दुःखें मग अनुभववी,
संग नसावा इ० ॥ २ ॥
कुजनाला अहि मानुनि टाळा,
त्याच्या बहिरंगास न भाळा,
व्रत विद्याधर कविचें पाळा,
संग नसावा इ० ॥ ३ ॥

---

## १८. खरा मित्र कोण ?

( 'चंद्रकांत' या चालीवर )

खाया प्याया कीं हुदडाया मित्र बहू जुळती।
आम्ही आहों मित्र तुझे हें प्रेमानें वदती ॥ १ ॥
गळ्यांत घालुनि गळा नित्य ते प्रेमें बागडती।
तुला न अंतर देउं कधींही असें सदा म्हणती ॥ २ ॥
परी खरें हें भाषण वर्तन समजुनि फसशील।
उपचाराचें केवळ त्यांचें हें आहे शील ॥ ३ ॥
मित्र न कोणी कोणाचाही, ज्याचा तो मित्र।
शब्द मित्र हा श्रवणा नयना, खसुमाचें चित्र ॥ ४ ॥
ज्याची शेंडी तुझिया हातीं तोच तुझा मित्र।
त्याचेंच तुला, नान्यांचें, सुखकर होइ चरित्र ॥ ५ ॥

तोच तुझ्या साहाय्या येइल संकटकाळांत ।
ज्याला संकटिं असेल लोटूं बल तव अंगांत ॥ ६ ॥
जगांत सारे ह्या तत्वावर होती व्यवहार ।
ज्याची भीती त्याची मैत्री करिजे साचार ॥ ७ ॥
ज्याची शेंडी माझ्या हातीं तो मम मित्र खरा ।
हें विद्याधर समजे परि तो नुमजे बहुवार ॥ ८ ॥

---

## १९. खरा शास्ता कोण ?

( गझल )

जनाला देइ जो न्याय । खरा तो मानिजे राय ॥ १ ॥
जनाचा वारि जो ताप । तयाचा तोच माबाप ॥ २ ॥
जनाचें रंजवी चित्त । जनाचें वाढवी वित्त ॥ ३ ॥
तयाला वंदिती लोक । पित्याला जेविं कीं तोक ॥ ४ ॥
जनाचें भव्य चिंतील । नृपा त्या सर्व वंदील ॥ ५ ॥
जनाचें घेउनी हेम । बघेना भूप तत्क्षेम ॥ ६ ॥
तयाला लोक शापील । तयाचा नाश चिंतील ॥ ७ ॥
जनाची मोडुनी जूट । तयीं जो पाडुनी फूट ॥ ८ ॥
स्थिरावी आपुलें स्थान । मिळेना त्या नृपा मान ॥ ९ ॥
स्वलोकां आदरें मंडी । जरी ते दुष्ट पाखंडी ॥ १० ॥
तयाला लोक शापील । विषाचा तो जणों कील ॥ ११ ॥
नसे ह्या बाध तत्वाला । पटे तें सर्व संतांना ॥ १२ ॥
सुताची वामनाच्या गी । न माना व्यर्थ वैतागी ॥ १३ ॥

---

## २०. खलवृत्ति

( 'नृपममता रामावरती' या चालीवर )

खलवृत्ती जाळी आंगा
मिळवुं कुठें शांती सांगा । ह्या जगीं ॥ ध्रु० ॥

वृत्ति बघुनि दुष्ट जनांची
होतसे लाहि मनाची । ह्या जगीं ।
स्वार्थास्तव खलजनसार्थ
बुडवितसे नित्य परार्थ । ह्या जगीं ।
निंदा खल भृश करितात,
गर्ह्य पथाप्रति वरितात । ह्या जगीं ।
खलजना, बघुनियां मना, होति यातना
कधीं खल वाटे, येओ नाचि माझ्या वाटें । ह्या जगीं ।
खलवृत्ती जाळी इ० ॥ १ ॥
मिळवाया खलजन कवडी
न्यायमती दूरचि दवडी । ह्या जगीं ।
परकीर्तिधनाची हानी
उत्सव तो अतिशुचि मानी । ह्या जगीं ।
परदारधनाची आस
लागली सतत खलास । ह्या जगीं ।
नीति तो, नित्य विसरतो, अनृत बोलतो ।
सुख लया नेई, खल दुःखें अगणित देई । ह्या जगीं ।
खलवृत्ती जाळी इ० ॥ २ ॥
ऐकिली खलकृती कानीं
कोणीही बुध नचि वानी । ह्या जगीं ।
व्हावया पराचा नाश
रचितो खल नाना पाश । ह्या जगीं ।
खलवृत्ति जगामधिं आली
राज्यें बहु नष्ट जहालीं । ह्या जगीं ।
खलमुखें, बघुनि मन दुखे, लोपतीं सुखें ।
नको खलसंग, कीं करी कीर्तिचा भंग । ह्या जगीं ।
खलवृत्ती जाळी इ० ॥ ३ ॥
प्रभु करो खलांचा अंत,
तोषवो सदा बुध संत । ह्या जगीं ।

सर्वत्र सुखें नांदावीं
शांतीची हानि न व्हावी । ह्या जगीं ।
परमेश्वर तो मज पावो
चित्ताची तळमळ जाओ । ह्या जगीं ।
म्हणुनि मी, प्रभो तुज नमीं, पडो नचि तमीं,
नया जो जागे, विद्याधर शांती मागे । ह्या जगीं ।
खलवृत्ती जाळी आंगा
मिळवुं कुठें शांती सांगा । ह्या जगीं ॥ ४ ॥

---

## २१. खलाचा आचार

फटक्याच्या चालीवर

खोल आणखी पतिता लोटी । दया खलाच्या नचि पोटीं ॥ ध्रु० ॥
विश्वासाचा घात करी खल,
गमतीसाठीं करि सुजनच्छल,
पापाविण खल जाउं न दे पल,
साधुस गांजी बोलुनि खोटीं । वचनें निशिदिनिं खल कोटी ॥ १ ॥
कवडीचाही स्वलाभ व्हाया
धनिकाच्या खल चाटी पायां
नमवी देवापुढें न काया
खल साधूची चोरुनि रोटी । त्याच्या दे हातिं नरोटी ॥ २ ॥
मत्सर शमवायास चहाडी
करुनि जना खल संकटिं पाडी
पाप खलाच्या खिळलें हाडीं
पाप खलाच्या संतत पोटीं । मधुर तयाच्या वच होटीं ॥ ३ ॥

---

## २२. खलाचें वर्तन

( फटका )

साधुविनाशा हावा तो पथ धरी, कधींही खल न अडे ।
आविर्भाव करुनि मैत्रीचा लोकांच्या खल गळां जडे ।
भुज विस्तारुनि, माया प्रकटुनि मानभावसा अहो! रडे ।
अशा नाटकी सोंगाच्या खल पाठीमागें हळूं दडे ।
पोटांत शिरुनि हृद्गत काढी कीं समयीं उपयोगीं पडे ।
विचार त्याच्या हृदयीं सदोदित कैसा व्यसनें सुजन नडे ।
दिवसा स्वजनीं वावरुनी खल रात्रीं जाई शत्रुकडे ।
द्रोह कराया स्वजनाचा खल गुपित असे तें करि उघडें ।
बहुविध रचितो खल पेंचा,
त्याला उघड्यावरि खेचा,
त्याचें जन हो ! शिर ठेंचा,
कीं टाळाया बल वेंचा,
दुर्दैवें खल गांठीं पडतां असेंच करणें भाग पडे ॥ १ ॥

---

## २३. खलाला जवळ करूं नये

( 'भज भज भव जलधिमाजिं' या चालीवर )

विषधरसम खल गणून त्यज रे ! खलाला ॥ ध्रु० ॥
बोलुनियां अनृत भात ।
खल करितो सुजनघात ।
मानुनियां मोक्ष यांत । त्यज रे ! इ० ॥ १ ॥
व्हायास्तव सुजननाश ।
रचितो खल विविध पाश ।
जेंवि जलीं कुशल दाश । त्यज रे ! इ० ॥ २ ॥
खल दावी गुणविरोध ।
सन्नाशीं सजुनि योध ।
विद्याधर करि सुबोध ॥ त्यज रे ! इ० ॥ ३ ॥

---

## २४. खलावर उपकार

( 'भाव धरा रे' या चालीवर )

दिधलें सापा । पय होतें गरल अपापा ॥ ध्रु०॥
केले कुजनावरि उपकार,
ममता दाखविली अनिवार,
तरि उलटा करि खल अपकार,
रचितो पापा । पय होतें० ॥ १ ॥
उद्धर्त्याला दावी फासे,
खाल्या घरचे मोजी वांसे,
हित कथि त्या गुरुला खल हासे,
खल दे तापा । पय होतें० ॥ २ ॥
विद्याधर हें हित आलापी,
मित्र करा न खलास कदापि,
कीं खलधी दुरिताची वापी,
पिकवी पापा । पय होतें गरल अपापा ॥ ३ ॥

---

## २५. चार ऋणें

( 'चंद्रकांत राजाची' या चालीवर )

प्रत्येकाला वारायाचीं चार ऋणें असतीं ।
पुरुष असो तो, किंवा स्त्री ती, हीं न ऋणें चुकतीं ॥ १ ॥
शक्यनुसारें विद्या शिकुनी ऋषिचें ऋण फिटतें ।
प्राचीनांशीं सद्यस्तन जग विद्येनें जुळतें ॥ २ ॥
प्राचीनांच्या विद्येनें नर त्यांच्याशीं जुळतो ।
नातरि होउनि अलग तयांच्या पासुनि तो पडतो ॥ ३ ॥
पूर्व ऋषींनीं ज्ञान संपदा कष्टें सांचविली ।
ती बहुमूल्य तयांनीं अपुल्या तनयां सर्व दिली ॥ ४ ॥

ग्रहण करोनी ज्ञानसंपदा त्यांचें ऋण वारा ।
नातरि तुमच्या हृदयीं मिळेल न शांतीला थारा ॥ ५ ॥
दुसरें ऋण जें तुम्ही फेडणें तें पितरांचें हो ! ।
अखंड चालुनि वंश तिलांजलिलाभ तयांना हो ॥ ६ ॥
देवांचें ऋण तिसरें, तेंही आवश्यक देणें ।
तेंही देउनि टाका नर हो ! नचि कचरा भेणें ॥ ७ ॥
श्रौत स्मार्त करुनि सर्व विधी सुखवा देवांना ।
विधि केल्यानें सर्व यथाक्रम होइ मोद त्यांना ॥ ८ ॥
चवथें ऋण जें तें विस्तारें सांगाया हावें ।
कीं न तुम्हाला त्याचें संप्रति वारेंही ठावें ॥ ९ ॥
श्वासोच्छ्वास करा ही आज्ञा आवश्यक नाहीं ।
जो तो करितो क्रिया स्वयें ती, श्रम न तया कांहीं ॥ १० ॥
चवथें वारा ऋण हा न विधी कथिला आर्यांनीं ।
आज्ञा श्वासोच्छ्वास करा ही कोण कुटी कांनीं? ॥ ११ ॥
देशाचें ऋण वारायाचे मार्ग विविध असती ।
हाव्या त्या मार्गांनें तुम्हि जा, कचरूं द्या न मती ॥ १२ ॥
देशासाठीं स्वयें कष्टणें, आळविणें देवा ।
देशासाठीं कष्टति त्यांची करणें कीं सेवा ॥ १३ ॥
देशाचें हित मनें चिंतिणें, वाचेनें वदणें ।
अंगें करणें, तेणें दीजे मुक्ति तुम्हांस ऋणें ॥ १४ ॥
देशाचें ऋण गुरुतम हें ऋण, अनृत न ही उक्ती ।
हें ऋण वारी जो न तयाला लाभेल न मुक्ती ॥ १५ ॥
गजेंद्र पंकीं रुतुनि कष्टतो त्याचे परि आज ।
देश कष्टतो, धरा तयाची कांहिं तरी लाज ॥ १६ ॥
आपत्तींतुनि देश उद्धरा, विलंब लावुं नका ।
कास कसुनि या पुढें, न मागें भीतीनें सरका ॥ १७ ॥
प्राण गेलियावरि धन्वन्तरि काय शकेल करूं ? ।
मृत झाल्यावर देश शकाल न त्यांत प्राण भरूं ॥ १८ ॥

विश्वबंधुता, संस्कृति, चातुर्वर्ण्य, सत्य, धर्म ।
ह्या देशाचे प्राण पांच ते जगवा, शुचि कर्म ॥ १९ ॥
देशाचे हे प्राण पांच ते मरणाच्या द्वारीं–।
असती, ते जगवाया या हो! कष्ट करा भारी ॥ २० ॥
देश मराया असे लागला, न मरों द्या त्याला ।
त्यास जगविणें ह्या जागा तुम्हि गुरु कर्तव्याला ॥ २१ ॥
देशाभ्युदया कष्ट सहुनि हें चवथें ऋण फेडा ।
खरा बोध हा परिसा, न म्हणा विद्याधर वेडा ॥ २२ ॥

---

## २६. चिंतूर

एका मुलानें एका चिंतुराचे पंख उपटून त्याला गवतांत टाकून दिलें. तो चिंतुर विव्हळत असतां त्याला पाहून सुचलेले विचार.

( ' भूपति खरे ते इ० ' या चालीवर )

बालका ! काय तूं केलें कर्म अघोर ।
नेणसी लेशही, कीं तूं अल्लड पोर ॥ १ ॥
क्रीडनीं कर्म हें त्वां केलें अज्ञानें ।
बोल मी लावितों न तुला ह्या गानानें ॥ २ ॥
पाखरूं विचारें स्वैर फिरत होतें तें ।
निःशंक बालका ! तें आनंदित चेतें ॥ ३ ॥
बागेंत रम्य हीं कुसुमें अगणित असतीं !
एकैक जें गमे वनदेवीची वसती ॥ ४ ॥
हीं फुलें फिरुनि तें मध गोळा करितांना ।
पाखरूं घेतसे नानापरिच्या ताना ॥ ५ ॥
मंजुगुंजारवें कुसुमेशीं आमोदें ।
हिंडलें पाखरूं, उभयें मारुत कोंदे ॥ ६ ॥
क्रीडनीं उपटिले त्वां त्याचे रे ! पंख ।
धनिकास नाडुनी चोर करी कीं रंख ॥ ७ ॥

पाखरूं विचारें तें थिवळे गवतांत ।
पालथें उताणें शिव ! शिव ! झाला घात ॥८ ॥
तें उडों शकेल न आतां ह्या जन्मांत ।
लोटिलें तयाला त्वां खरतर दुःखांत ॥ ९ ॥
संपलीं गुंजनें, भ्रमणें, मधुपानें वा ।
त्याचिया सुखाचा त्वां हरिला रे ! कैंवा ॥ १० ॥
बालका ! जाहला खेळ तुझा क्षणमात्र ।
पाखरा मिळालें शाश्वत खंडित गात्र ॥ ११ ॥
करूं नको पुन्हा हे असले निर्दय चाळे ।
दुष्ट जो तयाची क्रौर्याला मति भाळे ॥ १२ ॥
जर तुझे तोडिले कोणी हे दो हात ।
वाटेल काय रे ! तुज हें आण मनांत ॥१३॥
वृत्ति जी इच्छिसी इतरांची तुज संगें ।
ती जगा वर्तनीं दाखविं बाळा ! अंगें ॥ १४ ॥
बोध हा स्मरें रे ! विद्याधर करितो तो ।
मार्ग हा हिताचा सद्गतिदायक होतो ॥ १५ ॥

---

## २७. जग कोणीकडे चाललें आहे?

( 'भूपती खरे ते' या चालीवर )

मज कळे न मानवजाति निघाली कोठें ।
हें मतीस माझ्या पडलें कोडें मोठें ॥
देवत्व नर झटे कीं दैत्यत्व मिळाया ।
हें मला कळेना, मच्छ्रम होती वाया
नरहत्येसाठीं यंत्रें । राक्षसी
फसवायासाठीं क्लृप्त्या । धाडसी
तोंडांत सुवच पापेच्छा । मानसीं
हे प्रकार पाहुनि विद्याधर म्हणतो कीं
दैत्यत्व वृद्धितें पावतसे ह्या लोकीं ॥

---

## २८. ज्याचा तो

(‘ भाव धरा रे! ’ या चालीवर )

कोण कुणाचा ? । नर जो तो अपुला साचा ॥ ध्रु० ॥
विभवीं जन जुळती भवतालीं,
अर्पिति विमुला सुस्तवनाली,
त्यजिति तया तो पडतां खालीं,
निर्णय याचा । नर जो तो अपुला साचा ॥ १ ॥
प्रेमें केला जो नर जवळीं
तो दुष्टत्वें नरडें कवळी,
उपकर्त्यांचें मन तो खवळी,
निर्णय याचा । नर जो तो अपुला साचा ॥ २ ॥
“ कोण कुणाचा सखा जिवा ? ” ही
कविरायाची उक्ति जनांहीं,
अनुभविली ती खोटी नाहीं,
निर्णय याचा । नर जो तो अपुला साचा ॥ ३ ॥
पुण्य करा तें स्वर्गा नेइल,
बांधवजन कामास न येइल,
विद्याधरवच शमसुख देइल,
निर्णय याचा । नर जो तो अपुला साचा ॥ ४ ॥

---

## २९. ज्याचा धर्म तया

( “ तूं माझा यजमान ” या चालीवर )

ज्याचा धर्म तया । गड्यांनो ज्याचा धर्म तया ॥ ध्रु० ॥
निज धर्मा जो त्यजि तो पापी । यम त्याला दापी ॥ १ ॥
तो खल जो निज सोडिल धर्मा । मिळवि न तो शर्मा ॥ २ ॥
विद्याधर कवि संसारपथीं । शमद उपाय कथी ॥ ३ ॥

---

## ३०. झाडाचें सुख

( ' मज गमे ऐसा ' या चालीवर )

तुज जगीं लाधे सुख खरें । भूरुहा रे ! ॥ ध्रु० ॥
पवनानें तव गळोत पानें,
तनु करपो तव रवितापानें,
समयिं मिळोत न वा जलपानें,
तरि अचल तुझ्या शम चित्ति ठरे भूरुहा रे ! ॥ १ ॥
केलों मी विफलाश खलांनीं,
गृहीं जखडिलों गज आलानीं,
वृथा माखिलों पूतिमलांनीं,
शम शिकविं, शमें खर दुःख सरे । भूरुहा रे ! ॥ २ ॥
जळति वृथा जे मम अभ्युदयीं
अशा खलीं मी पडतां अदयीं
तुजसा नसतां शम मम हृदयीं
भोगावें म्यां सुख काय बरें ? । भूरुहा रे ! ॥ ३ ॥

---

## ३१. दहिंवराचे बिंदु

( मात्रमणिबंध )

गेला मुलगा बागेंत खेळ धरोनी मनिं हेत ।
पांचच वर्षांचा बाळ, नांव तयाचें हरिपाळ ॥ १ ॥
बागेंमध्यें हरिपाळ खेळत होता बहु काळ ।
इकडुनि तिकडे तो धावे, आनंदातें बहु पावे ॥ २ ॥
कुसुमें पिवळीं लाल निळीं, कांहीं ताजीं, कांहिं शिळीं ।
तीं लावुनि तो नाकाला सेवित होता गंधाला ॥ ३ ॥
कुसुमें विविधें हुंगुन तीं मोद जाहला त्यास अती ।
फिरतां फिरतां बागेंत प्रसन्न झालें तच्चेत ॥ ४ ॥

३०३२

त्या पानांवरतीं बिंदु दवाचे जे खुलती ।
गमले मौक्तिक त्याला, तो झटला ते घ्यायाला ॥ ५ ॥
मोतीं समजुनि तीं घ्याया यत्न तयें केले वाया ।
मोठ्यांनाहि पडे भूल, कां न फसावें तें मूल ? ॥ ६ ॥
ते घ्याया मौक्तिक दाणे यत्न बहू केले त्याणें ।
त्याच्या ते न करीं आले, ओले त्याचे कर झाले ॥ ७ ॥
स्पर्शी बिंदु न ते टिकले, घेतां घेतां ते फुटले ।
दुःखी कष्टी हरिपाळ, घरांत गेला तो बाळ ॥ ८ ॥
मूर्ख पोरगा हरिपाळ, अज्ञ मूढ अति तो बाळ ।
जनास तो वेडा भासे, परंतु साधु जना हासे ॥ ९ ॥
जन हो ! त्यास नका निंदूं जयें इच्छिले हिमबिन्दू ।
फुटक्या कवड्या मिळवाया आपणहि शिणवितों काया ॥१०॥
आपण सारे हरिपाळ इच्छितसों जें गाबाळ ।
कीं त्यजितो पुण्यपथाला भुलुनी नश्वर लाभाला ॥ ११ ॥
नर पुण्यपथा विसरून नश्वर लाभा गुंतून ।
पाप गांठितो पदरांत श्रमवुनि देहा दिनरात ॥ १२ ॥
नश्वर सुंदर वस्तु किती मूढ जनाला मोहविती? ।
भुलतो हा नर मानाला, भुलतो तो नर विभवाला ॥ १३ ॥
झटतो हा नर अधिकारा, श्रमतो तो नर बडिवारा ।
करि पदवीस्तव कपटें हा, धनार्थ झिजवी तो देहा ॥ १४ ॥
ऐहिक विभवें नश्वर तीं भोगुनि इहलोकीं सरतीं ।
तीं परलोकीं न नरास लवही येतीं कामास ॥ १५ ॥
देशाचें जें वैभव तें अपुलें, अपुलें नचि सवतें ।
देशहितीं करणें कष्ट हेंचि महा पुण्य स्पष्ट ॥ १६ ॥
लाथ मारुनी स्वार्थास, देशहितीं कसुनी कास ।
यत्न करा वीरोत्तमसे हें विद्याधर याचितसे ॥ १७ ॥

---

## ३२. दास्य

( ' संत दयाळ कसे? ' या चालीवर )

कां धन मिळवाया ।
दास्यें कष्टविसी काया? ।। ध्रु० ।।
पाणउतारा झाल्याविण धन ।
मिळेल त्यांतचि तृप्त असो मन ।। १ ।।
नीचा पुढती वेंगाडुनि मुख ।
सांग कशाचें तुज होइल सुख ?।। २ ।।
मूर्ख धन्याची सेवा करितां ।
अमुल्य करिसी कां प्राण रिता ?।। ३ ।।
तुष्ट कराया दुष्ट धन्याला ।
वदसी कां रे ! अनृत वचाला? ।। ४ ।।
विद्याधर गणि अल्पहि पुष्कळ ।
अपमानाचा ज्यास नसे सल ।। ५ ।।

---

## ३३. दिव्याची मागणी

( ' चद्रकांत राजाची कन्या ' या चालीवर )

स्नेहाचा मी असे भुकेला, द्या मजला स्नेह ।
स्नेहबळें मी तुमचें करितों प्रकाशयुत गेह ।। १ ।।
अल्प मागणें माझें आहे, फार नको मातें ।
अल्पचि द्या, परि वेळेवरि द्या, प्रार्थि तुम्हां द्या तें ।। २ ।।
प्रामाणिक मी तुमची करितों यथाशक्ति सेवा ।
हें माझें वच सत्य असे, मी स्मरुनि वदे देवा ।। ३ ।।
मजला पाजा वेळेवारी एक पळी स्नेह ।
सेवा तुमची करीत राहिन जाळुनि मम देह ।। ४ ।।
संपत आलें आहे माझें जीवन मनिं आणा ।
स्नेह पळीभर देउनि माझ्या तगवा हो ! प्राणा ।। ५ ।।

प्राण गलियावरी तपेली ... स्नेह अनाठायां ।
समयीं अल्पाहि पुण्य ... द, असमयिं बहुही हो वायां ॥ ६ ॥
वेळीं धलपी ... कार्य करी तें तुळई न अवेळीं ।
वेळीं गे... थानीं कार्य करी तें न अवेळीं केळी ॥ ७ ॥
हिंद... त ... श मी, दीप जगाचा, प्रकाश भरपूर ।
मुमूर्षु मी, द्या स्नेहलव, नको आर्यांनो! पूर! ॥८॥

---

## ३४ दे गे बाई जोगवा

( ' दोहा ' वृत्त )

' देगे ! बाई जोगवा ' हा विनतीचा बोल ।
कोणीही अवधारिना, जन तो मानी फोल ॥ १ ॥
बंधुप्रीती आटली पाहों आज जगांत ।
जैशी कुत्सित आपगा ग्रीष्मींच्या काळांत ॥ २ ॥
बंधुप्रीतीचीं जगीं ऐकों स्तोत्रें फार ।
डोंबाऱ्याचीं ढोलकीं वाजतिं वारंवार ॥ ३ ॥
बंधुप्रीतीनें कृती न करी कोणी आज ।
शुष्क बढाया मारितां वाटे न कुणा लाज ॥ ४ ॥
दे गे ! बाई जोगवा ही विनती ऐकून ।
दारें लावुनि बैसती जन सदनांत लपून ॥ ५ ॥
गोड गमे हें ऐकुनी बोलुनि बंधुप्रेम ।
जें जें झळके लोचनीं तें तें नसतें हेम ॥ ६ ॥
दूर असो ती प्रीतिची औदार्याची बात ।
हक्काचीहि न मागणी कीजे पूर्ण जगांत ॥ ६ ॥
हक्काचें जें मागतो कोणी दीन नमून ।
तेंहि समर्थ टाळिजे त्या दीना खिजवून ॥ ८ ॥
हक्काचें कीं प्रीतिचें देणें देति न लोक ।
जो मागे तो बैसतो करीत सदनीं शोक ॥ ९ ॥

ह्या करिं सोटा ज्याचिया, त्या करिं भिक्षापात्र ।
तोच लहे निज कामना, तो न कुथे क्षणमात्र ॥ १० ॥
दूर असो तो जोगवा, हक्कहि मागायास ।
सोट्यावांचुनि नाढळे युक्ति दुजी मनुजास ॥ ११ ॥
नुघडी मुख तो दाबितां नकटें मुख उघडील ।
न वळे जो नर आर्जवें लाथ तया वळवील ॥ १२ ॥
विनती देना हक्क तो घ्यावा मारुनि लाथ ।
ऐसें निर्दय शील हें करिल दयेशीं साथ ॥ १३ ॥
सभ्य विनति विद्याधरा दे तें त्यास पुरेल ।
कर्कश शीलाचा तया मार्ग कधीं न रुचेल ॥ १४ ॥

---

## ३५. देशद्रोह आणि देशभक्ति

( " काशि या त्यजूं पदाला? " या चालीवर )

करुनि स्वदेशघाता । नर मिळवि नरकपाता ।
गमे देश असु जयाला । बुध मानिती तयाला ।
स्वार्थार्थ विकिल देशाला । झिडकरी जन त्याला ।
देशास देव भावील । पुण्य तो श्रेष्ठ मिळवील ॥

---

## ३६. देशहित

( ' भाव धरा रे! ' या चालीवर )

देशहितास । हृदयीं द्या उच्च निवास ॥ ध्रु० ॥
देशाचें हित मनीं घोळणें,
देशाचें हित वाचें वदणें,
देशाचें हित अंगें करणें,
हेंचि तुम्हांस । व्रत चढविल देवपणास ॥ १ ॥

मनिं देशाची दुःस्थिति आणा,
तिकडे न करा डोळा काणा,
देशहिताचा राखा बाणा,
कसुनी कास । या देशा सुखवायास ॥ २ ॥
पारतंत्र्य हा भोगी देश,
लाभे त्याला नचि सुखलेश,
विद्याधर ठसवो आवेश,
अजि देशास । फार असे तुमची आस ॥ ३ ॥

---

## ३७. धैर्यानें यत्न करा

( " तूं माझा यजमान " या चालीवर )

धैर्याची धरिं कास । बाळा !
धैर्याची धरिं कास ॥ धृ० ॥
आलस्याचा । नैराश्याचा
होउं नको तूं दास । बाळा ! धैर्याची० ॥ १ ॥
शतशा आलीं विघ्नें तरिही
चालविं तूं यत्नास । बाळा ! धैर्याची० ॥ २ ॥
पुन्हा पुन्हा करिं यत्न, फळाची
सोडुं नको कधिं आस । बाळा ! धैर्याची० ॥ ३ ॥
धैर्याचें फळ मिळेल ह्या स्मर
विद्याधरवचनास । बाळा ! धैर्याची० ॥ ४ ॥

---

## ३८. निरुपयोगी वस्तु

( ' रसने न राघवाच्या ' या चालीवर )

मित्रास संकटांत पाहोनि देइ हात ।
तो होय सत्य मित्र, गानार्ह तच्चरित्र ॥ १ ॥

रोगास जी निवारी कीं मृत्यु दूर सारी ।
ती ओषधीच, नान्य, लोकांत होइ मान्य ॥ २ ॥
बाहेर रम्य रूप चित्तांत पापकूप ।
तो हो न योग्य संगा, तो हेतु शांतिभंगा ॥ ३ ॥
पांडित्य थोर बाया जें अन्न दे न खाया ।
जें ज्ञान सौख्य देना स्तुत्यर्ह तें असेना ॥ ४ ॥
चोरांस जो न वारी, लोकांस जो न तारी ।
तो निंद्य होय भूप, तो दुष्ट दैत्यरूप ॥ ५ ॥
जें सद्रसें विहीन तें काव्य रंजवी न ।
श्रोत्यांस जें पटेल तें थोरवी लहेल ॥ ६ ॥
साधील वस्तु इष्ट ती वानितात शिष्ट ।
चिंध्या असंख्य वाया ,त्या झाकिती न काया ॥ ७ ॥

---

## ३९. परिस्थितीवर सुख अवलंबून नसतें

( मात्रामणिबंध )

कालच्याच पुलिनामाजीं । तीच नदी वाहे आजी ॥
तेच तरू कांठावरती । वायूनें डुलती झुलती ॥ १ ॥
पुष्पें तरुवर आज तशीं । हसतीं हसलीं काल जशीं ॥
तसेच पक्षी तरुवरती । चिवाचिवती कीं किलबिलती ॥ २ ॥
कालच्याच परि गगनांत । श्वेत मेघ संचरतात ॥
चरति सुखें ठायीं ठायीं । कुरणामध्यें ह्या गायी ॥ ३ ॥
कालचाच हा समय असे । कालच्याच मी स्थलीं बसे ॥
मनास काल समाधान । झालें तें हो अजि कां न ? ॥ ४ ॥
आत्मा काल इथें रमला । तास मला क्षणसा गमला ॥
संमुख झालें काल सुख । आज होइ कां तें विमुख ? ॥ ५ ॥
विचार केल्यावरि मजला । प्रश्न अंशता उलगडला ॥
स्थिति हाच सुखा आधार । न परिस्थिति जरि साचार ॥६॥

काल सुखाला मन पात्र । आज नसे तें तिलमात्र ।।
येतें हें पात्रत्व कसें । हें विद्याधर नेणतसे।। ७ ।।

---

# ४०. पावसाळ्यांतील ओढा

[ अंजनी ]

गांवामागुनि टाकुनि गावें वर्षर्तूतिल ओढा धावे ।
धावुनि धावुनि कष्ट न पावे शीघ्र गती धरुनी ।। १ ।।
तोय तयाचें फार गढूळ, त्या न जळाची भरवे चूळ ।
दिसें विसरला अपुलें मूळ हा ओढा आतां ।। २ ।।
धावे ओढा करोनि घाई, शीघ्र गतीनें वाहत जाई ।
क्षणहि न थांबे ही नवलाई, डौल बहू त्याचा ।। ३ ।।
ओढा डबक्यांतून निघाला, मलिन जलें तो पीन जहाला ।
गर्व फार मग त्याला आला, नद अपणा समजे।। ४ ।।
वर्षर्तुजलें माज तयाला येउनि अगदीं अंध जहाला ।
खाउनि माती ह्या अन्नाला दर्पानें फुगला ।। ५ ।।
वाटेंतिल तो झाडें तोडी, सान झोपड्या क्रौर्यें मोडी ।
वाहवि गायी शेळ्या घोडीं, न दयालव त्याला ।। ६ ।।
अशा प्रकारें ओढा वागे, नाश बहू करि तरिहि न भागे ।
पाहे न कधीं वळोनि मागें, दर्प किती त्याचा ?।। ७ ।।
करोनि ऐशा पापी लीला, दुष्टाच्या ह्या प्रकटुनि शीला ।
जाई अविरत अधोगतीला हा ओढा पुढती ।। ८ ।।
सरतां वर्षर्तू ओढा हा रोडावत जातोच पहा हा ! ।
ग्रीष्मीं म्हणतो तो मग हा हा ! दुःखानें ग्रस्त ।। ९ ।।
जललव त्यांत न एकहि उरतो, दुःखामध्यें तो मग मरतो ।
त्याचा सगळा गर्वहि सरतो, दुःसह दैवगती ! ।। १० ।।
विधिनें निर्मियलें ओढ्यास उपमा द्यायासाठिं खलास ।
हेतू दोघे जगिं नाशास, साम्य पुरापूर ।। ११ ।।

समाज लोटी खल दुःखांत स्वर्गप्राप्ती मानुनि त्यांत ।
ओढ्याचे परि करितो घात, दोघेही दुष्ट ॥ १२ ॥
खल विसरे निज आईबापां, कृतिनें घेई जनताशापा ।
संतत करितो बहुविध पापां, लाज न लव त्याला ॥ १३ ॥
शंका सोडुनि लोकां बुडवी, अनाथ जन तो पायीं तुडवी ।
शिंतोडे साधुवरी उडवी, खलवृत्ती ऐशी ॥ १४ ॥
समाज लोटी खल दुःखांत, स्वर्गप्राप्ती मानुनि त्यांत ।
ओढ्यापरि तो करितो घात, दोघेही दुष्ट ॥ १५ ॥
मरोनि खल तो नरकीं जातो, मागें दुर्लौकिकाचि रहातो ।
जन हो ! खलमार्गा सोडा तो अंतीं दे दुःख ॥ १६ ॥

---

## ४१. प्रिय असुपरि

(गुर्जरी राग, रूपक ताल, अष्टपदी.)

प्रिय असुपरि मम सुत नगरिं असो ।
क्षणभरिंहि तनय विपिनिं नचि वसो ॥ १ ॥
कोपने ! सोडुनि दे तव कोप सये ! । ध्रुवपद ।
वितरिन नृपातीविभव तव तनया ।
त्यजिं हठ तव, करिं न रमणि ! अनया ॥ २ ॥
कोपने इ०
चिरिल सुतविरह तवपतिहृदया ।
अतिमातिमाति ! सति ! रमणि ! करिं दया ॥ ३ ॥
कोपने इ०
नत शिर मम तव बघ सखि ! चरणीं ।
त्यजिं रति झडकरिं अनुचितकरणीं ॥ ४ ॥
कोपने इ०
दुखाविलिस कधिंच न मम सखि ! सुतें ।
गुरुजनसमुचितविनयगुणयुतें ॥ ५ ॥
कोपने इ०

स्थविरपतिमरणभय हृदयिं धरीं ।
दुरितपथगमन हतसुख न करीं ॥ ६ ॥
कोपने इ०
नमवुनि शिर पति तव पदिं पडतों ।
नृप तरि अगतिक शिशुपरि रडतों ॥ ७ ॥
कोपने इ०
दशरथवचन विबुधरतिद असो ।
हरिसुतसुतसुत कवि अशम नसो ॥ ८ ॥
कोपने इ०

---

## ४२. कैकयीप्रत दशरथ

[रामकराग, रूपकताल, अष्टपदी]

प्रियतनया मम केकयनन्दिनि ! वास न दे सखि ! काननीं ।
कुवलयपेशल तो शिशु; यो तव अल्प तरी करुणा मनीं ॥ १ ॥
नमितों तव पदसारसें । हो मृदु सखि ! करुणारसें ॥
किसलयकोमलपाद कथीं मज तो विचरेल कसा वनीं ।
रविकर ते खरतेज पडोत न त्या शिशुच्या मधुराननीं ॥ २ ॥
नमितों इ०
अकरुण होउं नको सखि ह्या जनिं ! सौख्यदयारसभाजनीं ।
तव पति वंदितसे चरणा तव, कोप नसो तव ह्या जनीं ॥ ३ ॥
नमितों इ०
हठ तव सोडुनि दे मृदु हो तुज मी करितों सखि ! वन्दना ।
प्रिय दयिते ! वनिं कंटककर्कश धाडुं नको मम नन्दना ॥ ४ ॥
नमितों इ०
नृपतनये ! न करीं न करीं कृति गर्ह्य करील न रंक ज्या ।
सकरुण हो तव चित्त सखे ! तव मी नमितों पदपंकजा ॥ ५ ॥
नमितों इ०

प्रिय तनया मम धाडुं नको वनिं शीलपराजितचन्दना ।
त्वदितर मानव धाडिल काननिं कोण तरी मम नन्दना ?॥ ६ ॥
नमितों इ०

तव भरता युवराजपदार्पण निश्चित मी करितों पहा ।
परि मम राम असो नगरीं मम, पूरवि कामिनि ! काम हा ॥ ७ ॥
नमितों इ०

शमद धरी पथ वामननन्दन जो धरिला भविं साधुंनीं ।
दशरथभाषण शंसुनियां सुख तो मिळवो शम साधुनी ॥ ८ ॥
नमितों इ०

---

# ४३. प्रेम विकत घेतां येत नाहीं

( ' विकट वाट ' या चालीवर )

द्रव्य वेचितां मिळे न ऐशी वस्तु एकहि न भूवरती ।
जवळ असो वा दूर असो वा सुलभ असो वा दुर्लभ ती ॥
खाद्यें पेयें दृश्यें श्राव्यें भोग्यें विविधें बहु सुरसें ।
सारीं मिळवूं शकेल तो नर जो धन वेचू सिद्ध असे ॥
हय रथ वारण सुंदर मंदिर उद्यानें आभरणेंही ।
वस्त्रें पात्रें द्रव्य वेचितां शकेल मिळवाया देही ॥
परी प्रेम ही एकच वस्तू द्रव्यानें न कधीं मिळते ।
खऱ्या शमाचा खऱ्या सुखाचा उगम असे भुवि एकच तें ॥
ज्यावरि मत्प्रेम असे तो
जबाब मत्प्रेमा देतो
सुखदुःखें भोगा घेतो
तोच मनाला मम येतो
परी असा उरला न एकही, स्थिति ही दुःसह असे अती ॥

---

## ४४. फार वेळां निराशा झाल्यानें इच्छाच लोपते

( " चंद्रकांत " ह्या चालीवर )

जंवर नराला इच्छा असते वस्तूची प्रबळ ।
तंवर करी तो ती मिळवाया श्रम धारूनि फळ ॥ १ ॥
नानापरिची खटपट करितो ती मिळवायास ।
श्रमें न भागे, संतत झटतो कसोनि तो कास ॥ २ ॥
ह्यास विचारी, त्यास विचारी, सर्वांस विचारी ।
त्रिखंड धुंडी, विनवी सर्वां नम्रपणें भारी ॥ ३ ॥
फसतां त्याचा एक यत्न तो यत्न करी दुसरा ।
दुसरा त्याचा फसतां पुनरपि यत्न करी तिसरा ॥ ४ ॥
तिसरा फसतां चवथाहि करी, ध्येय न सोडी तो ।
इष्ट वस्तुच्या प्राप्तीसाठीं कष्टे भारी तो ॥ ५ ॥
अशा क्रमें बहु वेळ तयाचे फसले यत्न तर ।
औदासीन्य तयाच्या वेधी हृदया तीक्ष्ण शर ॥ ६ ॥
अतिशय खचतो वैतागानें सोडुनि यत्न बसे ।
इष्ट वस्तुची इच्छा त्याची क्षय मग पावतसे ॥ ७ ॥
त्या वस्तूचें नांवहि त्याला नायकवें श्रवणें ।
चिरनैराश्यज भाव न ऐसा अनुभविला कवणें ? ॥ ८ ॥
'पुन्हा पुन्हा करिं यत्न' असें जन कथितो परि चुकतो ॥
चिर नैराश्यें इच्छाच गळे, यत्नहि मग खचतो ॥ ९ ॥
अगणित वेळां विद्याधर हा झटला विभवार्थ ।
तितुके वेळां उभा ठाकला स्वार्थी खलसार्थ ॥ १० ॥
आतां मजला विभव नको, धन मृत्कणसें वाटे ।
शांति पुरे, तिजसंगें जाइन मरणाच्या वाटें ॥ ११ ॥

## ४५. फुलाची स्थिति

( " भज भज भव जलधिमाजिं " ह्या चालीवर )

स्थिति सुखमय तव अतीव कुसुमा ! जगांत ॥ धृ० ॥
मुकुलित तूं मधुर दिससि,
विकासित तूं अधिक खुलासि,
सततचि तूं रुचिर असासि,
भरसी मनांत । स्थिति सुखमय इ० ॥ १ ॥
सुविधि असो तुज न माज,
विधि उलटो तुज न लाज,
शम जनिचें गणुनि काज,
असासी सुखांत । स्थिति सुखमय इ० ॥ २ ॥
प्रकटुनि मधु गोड वास
अनुभवाविसि सुख जगास,
मिळविसि सुख तूं स्वतास,
अनृता न मात । स्थिति सुखमय इ० ॥ ३ ॥
जल न मिळो, चिरकसी न,
पशु तुडवो, कोपसी न,
नर हुंगो, माजसी न,
शम कीं तुझ्यांत । स्थिति सुखमय इ० ॥ ४ ॥
सुखिं मजला माज येइ,
दुःख शमा हरुनि नेइ,
लव कुसुमा ! मजासि देइ
शम जो तुझ्यांत । स्थिति सुखमय इ० ॥ ५ ॥

---

## ४६. फूल आणि मूल

( " चंद्रकांत राजाची कन्या " ह्या चालीवर " )

दोनच वस्तू पवित्र सुंदर कोमल दिसतात ।
तिजी न तैसी धुंडुनि बघतां दिसते जगतांत ॥ १ ॥

फूल मूल कीं मूल फूल ह्या त्या वस्तू दोन ।
पाहून फुला पाहून मुला सुख कवणा हो न ? ॥ २ ॥
फूल उमललें तरुवर पाहुन मूल गमे हासे ।
मूल अंकगत हासे तें मज फूल विकच भासे ॥ ३ ॥
मुकुलित वाटे फूल मूल कीं निद्रासुख घेतें ।
निद्रित मूल बघुनि मुकुलित तें फूल मनीं येतें ॥ ४ ॥
मूल फूल ह्या दोन्ही वस्तू अति कोमल असती ।
त्यांस डवचणें पातक भावी सर्वांचीच मती ॥ ५ ॥
विकच फूल तरुवर असतें तें निर्मळ बाहेर ।
अंतरिं असतें तसेंच निर्मल, कोठेंहि न केर ॥ ६ ॥
निसर्गनिर्मल मूल कोंवळें फुलापरी असतें ।
नयनां हेंही तेंही अतिशय आनंदद गमतें ॥ ७ ॥
मूल फुलांचें येथें थांबे साम्य, पुढें न टिके ।
मूल वाढलें अनन्त पापें करावयास शिके ॥ ८ ॥
जन्मीं निर्मल फूल असे जें तसेंच मरणीं तें ।
सुधात्व टाकुनि हलाहलत्व न केव्हांच धरी तें ॥ ९ ॥
मूल वाढतें, वाढुनि होतें काळें तें मोठें ।
नेणों शिकतें पापाचे तें विविध धडे कोठें ॥ १० ॥
स्वार्थानुसरण, परस्वहरण, प्रौढी पापांत ।
खोटें भाषण, उत्कट गोडी ऐहिक विभवांत ॥ ११ ॥
शब्दच्छलनापाटव,पाशव सामर्थ्योन्माद ।
वर्तन भाषण विचार ह्यांच्या ठायिं विसंवाद ॥ १२ ॥
अर्भक होतां पुरुष फुलाचें साम्य कसें लोपे ।
हे गुण येती मग कोठुनि हें न जाणणें सोपें ॥ १३ ॥
विद्याधर हें जाणायाला अति उत्सुक आहे ।
उकलून जनें कूट वदावें, अगम्य त्याला हें ॥ १४ ॥

———

# ४७. बोरी आणि बाभळी यांचा संवाद

( "अजि शेवटचा" ह्या चालीवर )

बाभळी:—

तुम्हि बोरींनो ! दूर सरा, दूर सरा,
संग गमे तुमचा न बरा ।
तनु तुमची ती अतिशय हो ! । कांटेरी
बघतां ती येई घेरी ।
सुम तुमचें तें बारिक गंधाविहीन
एका फलिं कीटक तीन ।
प्राण्यां न देतसां छाया,
खडबडीत तुमची काया,
जनि तुमची दिसते वाया,
जा बायांनो ! या न इथें, दूर सरा,
संगतिचा न विटाळ करा ॥ १ ॥

बोरी:—

तुम्हि बाभळिंनो ! गर्व कशाला करितां ?
आम्हां तो गमतोच रिता ।
तनु तुमच्या त्या अमुच्यापरि कांटेरी, ।
सुम तुमचें जरि सोनेरी, ।
फळ अमुचें हें नर खातात जपून
शेंगा न बघति ढुंकून ।
काढा न वर्म अमुचीं,
अम्हि जाणों वर्मे तुमचीं,
दुसऱ्यास उगा जो डवची
तो मूर्ख असे भोगितसे तो आहिता,
त्यासवें न संगति उचिता ॥ २ ॥

## ४८. भोगी तो शर्मा

भोगी तो शर्मा । खरोखर ।
स्मरे जो सतत नया धर्मा ॥ ध्रु० ॥
भीति न त्याला जो दुसऱ्याच्या
शोधि न कधिं वर्मा ॥ ध्रु० ॥ १ ॥
निंदिति लोक न त्यास कधींही
करि जो न कुकर्मा ॥ २ ॥
जो दुसऱ्याची न करी निंदा
भंगि न तन्नर्मा ॥ ३ ॥

---

## ४९. मत्सर

( " कधिं करिती लग्न माझें " ह्या चालीवर )

तनयांनों ! आर्यभूच्या सोडुनि द्या मत्सरा ॥ ध्रु० ॥
मत्सरें । देश बुडविले,
लोक तुडविले,
प्रेम उडविलें,
मत्सरा वारा । सोडुनि द्या मत्सरा ॥ १ ॥

बंधुता । हृदयिं साठवा,
धर्म आठवा,
वैर पाठवा
दूर परभारा । सोडुनि द्या मत्सरा ॥ २ ॥

प्रीतिनें । क्षोभ चेपणें,
गोड बोलणें,
सौम्य वागणें,
सुखा हा थारा । सोडुनि द्या मत्सरा ॥ ३ ॥

सौख्यदा वामनात्मजा
रीति ही भजा,
क्षुब्धता त्यजा
करुनि सुविचारा । सोडुनि द्या मत्सरा ॥ ४ ॥

---

## ५०. माझा देश हा माझा देव

( " तूं माझा यजमान " या चालीवर )

तूं होसी मम देव ।
देशा ! तूं होसी मम देव ॥ ध्रु० ॥
तूं मज खाया प्याया देसी ।
तूंच जिवाची ठेव ॥ १ ॥
तव सुस्थितिचे साठीं श्रमतां ।
मजला येइल चेव ॥ २ ॥
मी तुज सुस्थिति परतुनि याया ।
शुष्कहि खाइन रेव ॥ ३ ॥
तुज साठीं मी वामननंदन ।
देईन यमा खेंव ॥ ४ ॥

---

## ५१. मायभूमीसाठीं झटावें

( " तूं टाक चिरुनि ही मान " ह्या चालीवर )

कर्तव्य करुनि सायास । लहा सुकृतास ।
नातरि होशील पात्र खरतरारे! । नरकींच्या भोगास ॥ ध्रु० ॥
मायभूमि तारायास,
श्रम उदण्ड सोसायास,
सिद्ध हो कसुनि तूं कास,

तुज जन्म देइ जी भूमि
तिच्यांताचे होउं नको तूं दास ॥ १ ॥
आर्यभूस लागे फास,
लागली तिला तव आस,
त्यजिं दूर समस्त विलास,
दास्यांतुनि ही भूमि सोडवूं ये ।
सहुनि बहू कष्टास ॥ २ ॥
घालि जी तुला जन्मास,
तुजवरी ठेवि विश्वास,
जी बहू सोशिते त्रास
तिजसाठीं यत्न करीं रे ! ।
दे तिज गोड सुखाचा घास ॥ ३ ॥

---

## ५२. मृत पुत्राबद्दल विलाप

दुःखा हासे मम हा । न कळे तरु बोधी शम हा ॥ ध्रु० ॥
जयें तरू हा स्वयें लाविला, जयें जलें मग तो वाढविला,
सर्वांगीं तरु पाहुनि फुलला, अंतरंगिं जो अतिशय खुलला,
तो मम बालक मरून गेला, अदय यमानें वोढुनि नेला,
तरि पूर्वीपरि तरु हा फुलतो, दुःखानें तरु हृदयिं न उलतो,
बाळ असो कीं नसो, सारखा तरु शोका हा गमे पारखा,
पोरासाठीं विलाप कसला, म्हणुनि हसे सुमरूपें मजला,
पितृमन कोमल त्यास न ठावें, हसे तरू हा कठोर भावें,
किंवा झालें दुःख विसरुनी, निज कर्तव्यें अबाध करुनी,
मूढ न हो रे ! दुःखा रोधीं,हें ज्ञानी तरु मजला बोधी,
धीर मावळे, कंठ आवळे, रडे दाटतें, वक्ष फाटतें,
मृत बाळास्तव दुःख पिता करि, तद्दुःखा तरु कैसा आवरि,
करो बोध तो, मनिं न थारतो हाय हाय ! हा आत्मा जळतो,

तरु मज हासो कीं उपहासो, मी मूढापरि हे गोष्ट खरी ।
दुःखा हासे मम हा । न कळे तरु बोधी शम हा ! ॥

---

## ५३. यत्न सोडूं नये

( 'भाग्यें नरतनु सापडली' या चालीवर )

यत्न न सोडा बालांनों !।
शुभ हा बोध तुम्हा मानो ॥ ध्रु० ॥
पहिला फसला यत्न जरी ।
दुसरा करणें युक्त तरी ॥ १ ॥
दुसरा फसला तरि तिसरा ।
यत्न करा, मागें न सरा ॥ २ ॥
सत्वर जरि ना फळ आलें ।
तरि निश्चित येइल कालें ॥ ३ ॥
विद्याधर जी रीति कथी ।
तीच धरा संसारपथीं ॥ ४ ॥

---

## ५४. दुःखितांना साहाय्य करा

( " मज गमे ऐसा जनक तो " ह्या चालीवर )

व्यसन ज्यां गांजी त्यां नरां । व्हा दयाळू ॥ ध्रु० ॥
साधु जे अघा दूर त्यजिती,
जे पापाचे पथ नोळखिती,
म्हणुनि धूर्त ज्यां सहज फसविती,
त्या साधूंना साहाय्य करा । व्हा दयाळू ॥ १ ॥
दुर्दैवाच्या दुष्ट विलसितें
दुःखें साहाति उगाच अमितें,
दंड भोगिती विशुद्ध जरि ते
तयां हात द्या, नचि दूर सरा । व्हा दयाळू ॥ २ ॥

बुडत्याला खल खोल पाडिती,
विपन्नास खल अधिक नाडिती,
विद्याधर कथि जागा स्वहितीं,
तरि दीनावनिं मति नित्य धरा । व्हा दयाळू ।। ३ ।।

---

## ५५. शांत होइं गा हत हृदया !

( 'उद्धवा शांतवन' या चालिवर )

शांत होइं गा हत हृदया ! कोण तुझी करणार दया ? ।।ध्रु०।।
दैवाचे बहुविध घाले आजवरी तुजवर आले,
दयितेच्या सांत्ववचें ते सह्य तुला हृदया ! झाले,
आवरोनि निज दुःखा ती वदतां तें दुःख विरालें,
मम अश्रू तीनें पुशिले,
तुज धैर्यहि तीनेंच दिलें,
मम सौख्य प्रियतम गणिलें,
सौख्य अतां गेलें विलया,
शांत होइं इ० ।। १ ।।
मम सौख्य दुःख तें तीचें, तीचें तें मम भोगाया,
परि आतां मी एकाकी, गेली ती उत्तम ठाया,
कुणि नुरलें तुज सांत्वाया, करिं हृदया ! शोक न वायां
स्वर्गी ती दयिता गेली,
मम शांती तीणें नेली,
शून्य मला सृष्टी केली,
वृद्ध मी जीर्ण या समया
शांत होइं इ० ।। २ ।।
वय उरलें कैसें जावें ? किति दीर्घ तेंहि नचि ठावें,
मन कुणा जवळ उघडावें ? हित कुठें वचन ऐकावें ?
यश किमर्थ म्या मिळवावें ? त्या यशें कोण सुख पावे ?

होई गा हृदया ? शूर,
यम नसे फारसा दूर,
तो गमो न तुजला क्रूर,
दुःखावारे मिळवीं विजया,
शांत होई गा ! इ० ॥ ३ ॥

---

## ५६. शत्रूंचा उपदेश

( " भूपती खरे ते " ह्या चालीवर )

आपुलें कृत्य जें स्तवि रिपु तें न सदन्त ।
हें सत्य सांगती सकलां संतत संत ॥ १ ॥
जें बोधि कृत्य रिपु तें नसतें हितकारी ।
हें सत्य खरें तितकेंच म्हणे सुविचारी ॥ २ ॥
आपणा ह्यानिकर जें रिपुला वाटतसे ।
तें रिपू मित्रतामिष करुनी बोधितसे ॥ ३ ॥
आपला लाभ ती रिपु मानी निज हानी ।
आपली हानि ती लाभ महा रिपु मानी ॥ ४ ॥
जगिं धूर्त आढळति जे मैत्रीच्या व्याजें ।
करितात बोध तो अंतीं हृदया डाजे ॥ ५ ॥
सोडोनि पालका स्वच्छंदें वनिं हिंड ।
हें अजेस बोधी वृक खाया तत्पिंड ॥ ६ ॥
मार्जार मूषका बोधी ये उघड्यांत ।
मार्जार मूषका टाकुं बघे तोंडांत ॥ ७ ॥
चेतवी द्वेष हरि कपटें चार वृषांत ।
मोडतां जूट ते वृष हरिमुखिं पडतात ॥ ८ ॥
मत्सर स्वार्थ जो पेटवि बोधमिषानें ।
तच्चरित्र जन हो ! खोल पहा अवधानें ॥ ९ ॥
शत्रुचा नायका बोध, तुम्हा फसवील ।
मत्सर द्वेष हे जाणा वैभवकील ॥ १० ॥

निःस्वार्थ बंधुता विभव तुझा दावील ।
हें तत्त्व बोधितो विद्याधर शमशील ॥ ११ ॥

---

## ५७. आमचा 'जगा' ह्या नांवाचा पुत्र

( 'कधिं करिती लग्न माझें' या चालीवर )

शिव! शिव! तें बाळ गेलें, मूर्ती ती कोमळा ॥ ध्रु० ॥
मी स्मरें तोंड चिमुकलें,
केश विखुरले,
नेत्र उघडले,
तीटही भाळा ॥ १ ॥
हाय हा !! हृदय कळवळे,
धैर्य मम गळे,
रुदन कोसळे,
स्मरुनि त्या बाळा ॥ २ ॥
बाळका हरुनि कोमला,
नाडुनी मला,
लाभ जाहला
काय त्या काळा ? ॥ ३ ॥
आमुच्या चुरुनि शमनगा
कां अम्हा जगा !
सोडिलें जगा !
सांग वेल्हाळा ! ॥ ४ ॥

---

## ५८. शुक्राच्या चांदणीस उद्देशून

( " भूपती खरे ते " ह्या चालीवर " )

गर्दींत लेंकरूं धरि ताताचा हात ।
कीं हात सुटालिया होइल मोठा घात ॥ १ ॥

हात तें लेंकरूं धरि उजवा कीं डावा ।
कोणता तरी धरि कीं ताता न चुकावा ॥ २ ॥
एकदा तो असे इकडे, मग तो तिकडे ।
कोठेंहि तो असो, चुकला तो हें न घडे ॥ ३ ॥
त्या मुलापरी तूं शुक्रा ! मजला गमसी ।
कीं सोडुनि सूर्या तूं दूर कधीं नससी ॥ ४ ॥
विश्वांत कोंदले ग्रह, नक्षत्रें, तारे ।
त्यांतून चालणें वाटवि भय तुज ना रे ! ॥ ५ ॥
तूं कधीं प्रभातीं सूर्याआधीं दिससी ।
बा ! कधीं दिनान्तीं सूर्यामागें अससी ॥ ६ ॥
आगुती मागुती केव्हांही दिसलास ।
तरि सूर्यापाशीं अससी, त्याजीसि न त्यास ॥ ७ ॥
गोल जे कोंदले विश्वामधिं कोट्यवधी ।
त्यामधीं चालतां वागे सावध तव धी ॥ ८ ॥
तूं खरा शाहणा मजला शुक्रा ! दिससी ।
पालका सोडिना तो वाटे स्तुत्य मसीं ॥ ९ ॥
स्वग्रणीस धरि जो धूर्तांच्या निकरांत
तो खरा शाहणा तुजसा सत्य जगांत ॥ १० ॥
करि जनांस विद्याधर हा बोध पवित्र ।
पाहुनी अनुसरा जनहो ! शुक्रचरित्र ॥११॥

---

## ५९. शुद्धिगुण

( 'भाव धरा रे!' या चालीवर )

शुद्धिगुणानें । नर होतो मंडित मानें ॥ ध्रु० ॥
अवकरिं जेंवि कृमी संचरती
तेंवि अधें नरमनिं वळवळती
तर मुखसुंदरता गोड न तीं
शुद्ध मनानें । नर होतो इ० ॥ १ ॥

मधुर असो स्वर गोड न वच तें
साधुस बोले जर भलभलतें
तें वच निंद्य, मनीं जें सलतें
शुद्ध वचानें । नर होतो इ० ॥ २ ॥

रत्नजडित घेउनि तरवार
सज्जनकंठ चिरी हळुवार
त्याचा निंद्य असे आचार
सच्चरितानें । नर होतो इ० ॥ ३ ॥

त्रिविधा शुद्धि झटा मिळवाया,
राखा शुद्ध मनोवाक्काया,
विद्याधर अन्य गणीं वाया,
शुद्धपणानें । नर होतो मंडित मानें ॥ ४ ॥

---

## ६०. शोकरूपी शंकु

( " चंद्रकांत " ह्या चालीवर )

कोणत्याहि कुणिही झाडाच्या बुंध्यांत ।
ठोकिला खिळा तो जाउनि रुततो त्यांत ।
वाढतें झाड तें नैसर्गिक नियमानें ।
तें असोनि आधीं आकारानें सानें ॥ २ ॥
होओनि उंच तें झटतें गगना वेधूं ।
चारही दिशां तें निजशाखांनीं छेदूं ॥ ३ ॥
झाड तें जाड वा होतां उच्छ्रित काळें ।
त्यांतील तो खिळा स्थानाहून न हाले ॥ ४ ॥
झाड तें वाढतां निज पेशींनी वेढी–।
त्या खिळ्यास, राहे तो आंत, पडे तेढी ॥ ५ ॥
उंच तो होतसे खोडासंगें काळें ।
खोल तो बैसतो, पेशी त्याभवताले ॥ ६ ॥

दृष्टिला तो खिळा मग न दिसेसा होई ।
खोडांत तो जणों लपवुनि बैसे डोई ॥ ७ ॥
जाहला जरी तो नेत्रांस अदृश्य तरी ।
खोडाचिया बसे खोल गढुनि तो उदरीं ॥ ८ ॥
दृष्टान्त हा जुगे सांसारिक यात्रेस ।
जी अनन्तकालप्रान्ताकडची वेस ॥ ९ ॥
हानि जी येतसे मनुजाच्या भोगास ।
ती सले सदोदित पाहों तद्हृदयास ॥ १० ॥
बाल हा, माय तो, हा जनक, गुरूत्तम तो ।
भक्षिला अंतकें स्मरुनी शोचित बसतो ॥ ११ ॥
हानि जी होतसे बहुविध ह्या संसारीं ।
जी भरूनि येना ती छाळि मनुजा भारी ॥ १२ ॥
दुःख तें प्रकटलें बाहेर जरी आधीं ।
तरि पुढें गढुनि तें हृदया दे बहु आधी ॥ १३ ॥
मानवा होइ तो शोक गढे हृदयांत ।
ठोकिला खिळासा झाडाच्या खोडांत ॥ १४ ॥
तो खिळा झाड तें दोन्ही समकालान्त ।
शोक तो, हृदय तें, योग्य गमे दृष्टान्त ॥ १५ ॥
पाहतों शेकडों स्मितमुख नर जगतांत ।
ज्यांचिया सले खरदुःखविशिख हृदयांत ॥ १६ ॥
रंगेल जो वरी तो न तसा हृदयांत ।
रंगला जरी तो आचारार्थ जनांत ॥ १७ ॥

---

## ६१ सत्यमेव जयते

फटक्याच्या चालीवर

पुष्कळ वाक्यें सदा आयकों तत्त्वें ज्यांना जन म्हणती ।
हीं वाक्यें बहुमान लाहतीं भोंदू जैसे कीं प्रणती ॥ १ ॥

सोनें बावनकशी गणी जन पितळेला हें आश्चर्य ।
लेउनि माळा, चर्चुनि भस्में शूद्र होतसे मुनिवर्य ॥ २ ॥
'सत्यमेव जयते' ह्या वाक्या असाच पाहों मान मिळे ।
भोंदू फसवी मूर्ख जनाला फासुनि भाळीं भस्म टिळे ॥ ३ ॥
किंप्रभुनीं जींग अनेक सत्यें लोपविलीं हें जन जाणे ।
सत्यें रगडुनि चूर्ण कराया समर्थ किंप्रभु हे घाणे ॥ ४ ॥
किंप्रभु लोपवि सत्यें अप्रिय असिसामर्थ्यें जन मूक ।
सत्यें दडतीं जनहृदयीं रवितापीं, गिरिगह्वरिं घूक ॥ ५ ॥
सत्यें बावनकशीहि असतां लेखांवांचुनि होतिं फुकीं ।
खोटा इतिहास लहे आदर खऱ्यास म्हणती लोक चुकी ॥६॥

अनृता ऋतपदिं किम्प्रभु ने
सत्य हिंसिजे किंप्रभुनें,
जगेल तें होईल जुनें,
जुनें सत्य तें फळें सुनें,

'सत्यमेव जयते' ही उक्ती मनस्तमीं दुर्बल पणती ॥ ७ ॥
किंप्रभु खड्गें खरा लोपवी, निर्मी खोटा इतिहास ।
त्या खोट्याला खोटा म्हणतां चढतो कंठावरि फास ॥ ८ ॥
किंप्रभुच्या भीतीनें न शके जन सत्यें उच्चाराया ।
पिढी ती मरे, सत्यें मरतीं, येति असत्यें त्या ठायां ॥ ९ ॥
किंप्रभुनीं जीं प्रचलित केलीं तींच असत्यें मग उरतीं ।
सत्यांची यापरी होतसे या भुवनीं माती पुरतीं ॥ १० ॥
क्रोध, मत्सर, द्वेष बुडविती सत्यें अगणित किंप्रभुसे ।
स्वार्थामागें धावत असतां सत्याला कोणी न पुसे ॥ ११ ॥
सत्यां येई दंतकथांचें रूप पुढें त्याही गळती ।
पिढ्या लोपती, दंतकथाही सर्व तयांमागुनि पळती ॥ १२ ॥
कर्मधर्मसंयोगें टिकलें सत्य कधीं जर या भुवनीं ।
तर तें जीर्ण म्हणोनि न आदर पावतसे लवमात्र जनीं ॥१३॥

सत्य जिणी हें वच खोटें,
षडरि कुनृप मारिति सोटे,

ऋतास ऋत ह्मणतां तोटे,
न वदे नर सत्यहि होटें,
'सत्य जिणी' ही भ्रामक उक्ती,खरी न मानी बुध पळ ती १४

---

# ६२. समर्थांचा झोंडपणा

( ' भूपति खरे ते इ० ' या चालीवर )

जो समर्थ असतो त्याची इच्छा साधे ।
तत्व हें खरें, तें व्यवहारांत न बाधे ॥ १ ॥
जो दुर्बल असतो त्याचा न्याय्याहि पक्ष ।
जगिं टिके न, कवणहि घालि न त्यामाधिं लक्ष ॥ २ ॥
दुर्बला हाणितो समर्थ पाठीं लाठी ।
दुर्बला गांजितो समर्थ गमतीसाठीं ॥ ३ ॥
दुर्बला लुटाया समर्थ युक्त्या योजी ।
दुर्बलोक्त युक्ताहि समर्थ तृणसें मोजी ॥ ४ ॥
मांडिलें जगीं जें थैम, न समर्थांनीं ।
लोचनां न बघवे, न परिसवें तें कानीं ॥ ५ ॥
अधिकार थोर, पशुवृत्ति, कनक भवतालीं ।
ही त्रयी जयीं तो जग हें दुःखीं घाली ॥ ६ ॥
ह्या त्रयीस मिळतां बल सदीचें थोर ।
ती जगांत अगणित आणि विपत्ती घोर ॥ ७ ॥
सद्दिनें ही त्रयी होतां उग्र अवार्य ।
राक्षसी करि जगीं संहारात्मक कार्य ॥ ८ ॥
ही त्रयी सद्दिच्या दुःसह होई योगें ।
जग ताप भोगितें कीं ग्रस्त महारोगें ॥ ९ ॥
वित्तास्तव केवळ घुसणें परदेशांत,।
साधूंस गांजणें, करणें दारुण घात ॥ १० ॥
तेथलें प्रयत्नें नरनिर्मित धन सर्व ।
धन सृष्टिनिर्मिताहि हरणें कीं सुखपर्व ॥ ११ ॥

यापरी करी अतिघोर अनर्थ समर्थ ।
ते असह्य होती सर्व जगास अनर्थ ॥ १२ ॥
ह्या समर्थलीला हरिति जनांचे प्राण ।
हें श्मशानसन्निभ भूतल होइ भयाण ॥ १३ ॥
जो समर्थ असतो तो क्षितिवरि नुरल्यास ।
जग समस्त भोगिल निर्भर शांतिसुखास ॥ १४ ॥
देवत्ववृत्तिचा मनुजा गंधहि नसतां ।
खल मनुज दैत्यसा माजुनि गांजी जगता ॥ १५ ॥
भो जगच्चालका ! सुलट जगद्यंत्राला ।
दे गती देवगुण देई गा ! मनुजाला ॥ १६ ॥
परमार्थरूप हो स्वार्थ मनुष्याचा हा ।
आनंद विलसुनी शब्द नुरो भुवि ' हा ! ' हा ॥१७॥
जें असे ममच तें ममच तवहि ममच असे !
ही वृत्ति नष्ट हो जी नरमनिं आज वसे ॥ १८ ॥
भो जगच्चालका ! देइं नरा सद्बुद्धी ।
परवित्तलोभ हो हत, नर न रतो युद्धीं ॥ १९ ॥
बंधुता वाढुनी जगिं पशवृत्ति नुरावी ।
ही स्थिती शमावह विद्याधर कवि भावी ॥ २० ॥

---

## ६३. सुकृता जोडावें

( " बरवें समजा रे ! " ह्या चालीवर )

सुकृता जोडावें जोडावें । पापपथा सोडावें ॥ ध्रु० ॥
मनिं षड्रिपु चिरडावे । त्यांचें वडचि कीं मोडावें ॥ १ ॥
वर्तनिं उजवें डावें । ऐसें संकटिंही न घडावें ॥ २ ॥
खलसंगा तोडावें । विद्याधरवच कानिं पडावें ॥ ३ ॥

---

## ६४. सुपथा लागा

( 'भाव धरा रे!' या चालीवर )

सुपथा लागा । दुरिताच्या मार्गा त्यागा ध्रु० ॥
परहितकरणीं न कधीं भागा ।
दीनांवरती न धरा रागा ।
नित्य विवेक असो मनिं जागा ।
निर्मल वागा । दुरिताच्या इ० ॥ १ ॥
दुष्कीर्तीच्या भिउनी डागा ।
षडरिगणा द्या चित्तिं न जागा ।
दूरुनि टाळा दुर्जननागा ।
सुजनिं न गागा । दुरिताच्या इ० ॥ २ ॥
आदरभावें गुरुजनिं वागा ।
संतत साधुचरित्रा ध्या गा! ।
विद्याधर कथि पुण्यद यागा ।
द्रव्य न मागा । दुरिताच्या इ० ॥ ३ ॥

---

## ६५. सुपथें चाला

( 'भाव धरा रे!' या चालीवर )

सुपथें चाला । फल यो कीं यो न तुम्हाला ॥ ध्रु० ॥
कां मळवा चाहडिनें आस्यें ?
कां धन मिळवा दुर्जनदास्यें ?
कां अधिकारार्थ करा लास्यें ?
न कुटा भाला । फल यो कीं यो न तुम्हाला ॥ १ ॥
दुरितानें जें वैभव मिळतें
तें संतत हृदयान्तरिं सलतें,
शुद्ध रहा सोसुनि दुःखशतें
चिंतुनि काला । फल यो कीं यो न तुम्हाला ॥ २ ॥

सद्वर्तनफल वित्त न म्हाणिजे,
निर्मलताफल भव्य न गाणिजे,
वामनतनयें शम आदरिजे
पात्र शमाला। फल यो कीं यो न तुम्हाला ॥ ३ ॥

---

## ६६. सूर्योदय

( " भूपति खरे ते " ह्या चालीवर )

सूर्य हा उगवला प्राचीच्या दिग्भागीं।
आरक्त होतसे मुख तीचें अनुरागी ॥ १ ॥
भेटतां प्रिय पती हर्षे कोण न पत्नी ?।
हर्ष हा नाणवे असतां तो दुरिं यत्नीं ॥ २ ॥
सरसींत तीं पहा पद्में सर्व उमललीं।
कोंडले त्यांत हे भुरुंभुरुं उडतात अली ॥ ३ ॥
हे अली हर्षले गुंजारव करितात।
स्वातंत्र्यलाभ दे हर्ष कुणा न जगांत ?॥ ४ ॥
व्योमिं हा वाहतो वायू शीतल मंद।
पावती सर्वही प्राणी अति आनंद ॥ ५ ॥
वायु हा देतसे उत्साह प्राण्यांस।
कर्तव्य लागती ते स्वीय करायास ॥ ६ ॥
उगवतां सूर्य हा लपती ते खद्योत।
रजनीस शोभली ती लपली तज्ज्योत ॥ ७ ॥
खेड्यांत वानिला नर नगरांत फिकावे।
मान तो न वा स्तुति नगरांत कधीं पावे ॥ ८ ॥
तम पळे रात्रिचें गिरिकंदरिं दडुनि बसे।
साधुला पाहुनी खल मुख चुकवीत असे ॥ ९ ॥
रानांत चाललीं गोवृंदेंहि चराया।
गोरक्ष चालले हे त्यांना रक्षाया ॥ १० ॥

हीं गुरें शेपट्या उभाविति आनंदानें ।
धावतात हर्षें जवळ कराया रानें ॥ ११ ॥
भास्करोदयाचा समय सुखद सर्वांना ।
परि नसे तसा तो दासांच्या हृदयांना ॥ १२ ॥
जो स्वतंत्र असतो त्या सूर्योदय सुख दे ।
दासास दे न हें विद्याधर तत्व वदे ॥ १३ ॥
दृष्टि आकुंचिता मम गणि देशाचि कारा ।
धन्य तो गणी जो कारा जीवपसारा ॥ १४ ॥

3632

## ६७. स्वार्थ आणि देशार्थ

('चंद्रकांत' या चालीवर)

रिपुपासुनि जो लाच खाउनी देशहिता बुडवी ।
रिपुचा आश्रय मिळवुनि नर जो स्वजातिला तुडवी ॥ १ ॥
प्रतिपक्ष्याच्या लाचा भुलुनी देउनि मत खोटें ।
स्वदेशपक्ष ध्वंसुनि जो करि देशाचे तोटे ॥ २ ॥
देशाच्या जो मित्रा निंदी माजुनि रिपुवित्तें ।
देशा दावी मार्ग हानिकर जो निस्त्रप चित्तें ॥ ३ ॥
तो नर लोकां खऱ्या स्वरूपें कळतां परिणामीं ।
त्याची होई छीथू, लपतो तो स्त्रीपरि धामीं ॥ ४ ॥
मरुनि नरकिं तो भोगी आधिव्याधि बहु कराला ।
आधिव्याधि सरति ह्या जेव्हां येइ मरण काला ॥ ५ ॥
होउनि गेले अनेक खल भुवि स्वार्थास्तव ज्यांनीं ।
परास घेउनि घरांत केली देशाची हानी ॥ ६ ॥
स्वार्थापेक्षां देशार्थ गणा बंधूंनो ! श्रेष्ठ ।
विद्याधरवच मिळवुनि देइल अंतिं तुम्हां प्रेष्ठ ॥ ७ ॥

## ६८. हिंददेशाचा शोक

( 'नृपममता रामावरती' या चालीवर )

हिंददेश करितो शोक ।
तुम्हि कसे शांत तत्तोक ? । या पुढें ॥ ध्रु० ॥
वस्त्र द्या त्यास ल्यायास
अन्न द्या त्यास खायास । या पुढें ।
तो मनांत फार उदास
तन्मनास सुखवायास । या पुढें ।
सुस्थिती त्यास यायास
सिद्ध व्हा कसुनि तुम्हि कास । या पुढें ।
उद्धरा । त्या करा त्वरा । धर्म आचरा ।
सरुं नका दूर । सरुं नका दूर ।
योध्यांचे परि व्हा शूर । या पुढें ।
हिंददेश करितो इ० ॥ १ ॥
पुरवसती सोडायास
खेड्यांताचि राहायास । या पुढें ।
शेतकींत मन घालाया
धान्य पुष्टिकर पिकवाया । या पुढें ।
अवसरीं रिकाम्या चरका
फिरवाया देउनि गरका । या पुढें ।
पुर पुरे । तेथ नय नुरे । लागती बुरे ।
ढंग मनुजास । ढंग मनुजास ।
दुष्ट तो त्यजा पुरवास । या पुढें
हिंददेश करितो इ० ॥ २ ॥
पूर्ण पोट जेवायास
शांति सौख्य मिळवायास । या पुढें ।
खादिचा नियम पाळाया
परदेशि वस्त्र जाळाया । या पुढें ।

स्वश्रमावरिच विश्वास
सर्व काळ ठेवायास । या पुढें ।
आपला । देश हा भला । सेवुं त्याजला,
उद्धरूं त्यास । उद्धरूं त्यास
विद्याधर धरि ही आस । या पुढें ।
हिंद देश करितो शोक
तुम्हि कसे शांत तत्तोक । या पुढें इ० ॥ ३ ॥

---

## ६९. द्रव्यानें प्रेम मिळत नाहीं

( फटका )

द्रव्य वेचितां मिळे न ऐशी वस्तु एकहि न भूवरती ।
जवळ असो वा दूर असो वा सुलभ असो वा दुर्लभ ती ॥१॥
खाद्यें पेयें दृश्यें श्राव्यें भोग्यें विविधें बहु सुरसें ।
सारीं भोगूं शकेल नर तो जो धन वेचूं सिद्ध असे ॥२॥
हय रथ वारण सुंदर मंदिर उद्यानें आभरणेंही ।
वस्त्रें पात्रें द्रव्य वेचितां शकेल मिळवाया देही ॥ ३ ॥
परी प्रेम ही एकच वस्तू द्रव्यानें न कधीं मिळते ।
खऱ्या शमाचा खऱ्या सुखाचा उगम असे भुवि एकच तें ॥४

माझ्या प्रेमा पात्र असे तो,
माझ्या प्रेमा जबाब देतो,
मम सुखदुःखें ओढुनि घेतो
तोचिं माझिया मनास येतो,
परी असा उरला न कोणिही, स्थिति ही दुःसह असे अति ॥

---

# ७० जेथें तेथें पैसा वेचा

( 'चंद्रकांत' या चालीवर )

पाश्चात्यांची संस्कृति बंधुप्रेमा नष्ट करी ।
रविकरसंतति तटिनीतोया संतत जेंवि हरी ॥ १ ॥
माझा मी, न कुणा दुसऱ्याचा, मदर्थ मी वाचें ।
मज न कुणाची परवा, होओ कांहींही त्यांचें ॥ २ ॥
अशी भावना उपजावि चित्तीं संस्कृति पाश्चात्य ।
ती मनुजाच्या माणुसकीतें हरुनि करी व्रात्य ॥ ३ ॥
ग्रामबंधनें, देशबंधनें संस्कृति लोपावि ती ।
जातिबंधनें, धर्मबंधनें, दुसरीं सांगुं किती ? ॥ ४ ॥
समाजसंस्था, कुटुंबसंस्था संस्कृति ती मोडी ।
वात्या अंबुदघटा ज्यापरी नभि जुळल्या फोडी ॥ ५ ॥
बंधुप्रेमा वचनीं उरला, उरला न कृतींत ।
जुनी संस्कृती लुप्त जाहली ग्रीष्मीं जणुं शीत ॥ ६ ॥
प्रेमास्तव कांहींहि कुणीही दुसऱ्याचें न करी ।
दिल्यास पैसा होतीं कार्यें ऐसी गोष्ट खरी ॥ ७ ॥
उठतां बसतां शिव ! शिव ! पैसा लागे वेचावा ।
प्रेम न वळवी, नरास पैसा वळवी, तो हावा ॥ ८ ॥
पाश्चात्य असे संस्कृति घडवी परिणाम समाजीं ।
जुनी संस्कृती असा धरोनी, विनती ही माजी ॥ ९ ॥
बंधुप्रेमतरूतें न मरों द्या हो आर्यांनो! ।
विद्याधरवच हें सर्वांना प्रेमोदित मानो ॥ १० ॥

---

## ७१. शेणाचे गोळे

( " चंद्रकांत राजाची " ह्या चालीवर )

मित्रा ! आपण दोघे आहों शेणाचे गोळे ।
क्षति न किती तूं किंवा किति मी वजन असों तोळे ॥ १ ॥
सांग गड्या ! मज निंदुनि होइल काय तुला केवा ।
शांत चित्त मम, कशास करिसी मित्रा ! मम हेवा ? ॥ २ ॥
मी गायीच्या, तूं रेड्याच्या शेणाचा गोटा ।
असा गर्व हा मजला वाटे बा मित्रा ! खोटा ॥ ३ ॥
ऐसा खोटा गर्व दाखविल नीच तुझें शील ।
सहवासाच्या सुखास केवल तूं अंतरशील ॥ ४ ॥
चुलींत जाशिल माझ्यापरि तूं, रक्षा होशील ।
वायुबलें तूं कणरूपें दश दिशांस उडशील ॥ ५ ॥
अशा प्रसंगीं गायीचें कीं रेड्याचें शेण ।
हा भेद नुरे, सिंहमुखाला वृषभ तसा एण ॥ ६ ॥
मरतां मरतां लाथा झाडुनि लाभ न तुज कांहीं ।
मत्सहवासीं सोडुनि ताठा सुख सेवुनि राहीं ॥ ७ ॥

---

## ७२ यमा! उद्धरीं

( फटक्याच्या चालीवर )

शुक्लपक्षिच्या चंद्रापरि हा शोक वाढतो हृदयांत ।
शोक शमेना, हृदय फुटेना, देहाचा होइ न पात ॥
पर्जन्यानें तडाग तुंबे तेव्हां त्यास फुटे पाट ।
परि शोकाला नेत्रांतुनि मम बाष्परूप न मिळे वाट ॥
शोक वाढतो, शोक कोंदतो, होतें काहुर हृदयांत ।
तरी फुटेना भंगेना हें हृदय पीडिलें दिनरात ॥
नुरला एकहि आप्त जयाला, शोकहेतु मी कळवीन ।
शुक पंजरगत हृदय खरोखर नियंत्रणेनें अतिदीन ॥

नेत्र न बाष्पें, कंठ न रुदनें, मुख न वचें देई वाट।
शोक कोंदला हृदयीं होइ न देहाचाही नयनाट ॥
वृद्धा मजला वित्त कीर्ति वा समाजसेवाही न रुचे।
कुंठित झालों, हताश झालों, काय करावें हें न सुचे ॥
स्थिति ही दुस्सह अतिमात्र,
नसतां ह्या स्थितिला पात्र,
होरपळे जणुं हें गात्र,
देइल शांती यममात्र,
शोकरूप ह्या गर्तेतुन मज यमा ! उद्धरीं दे हात ॥१॥

---

## ७३ जलप्रवास

( " उद्धवा शांतवन " ह्या चालीवर )

सजवुनी होडकें मोठें जलमार्गें सजलों जाया ॥ ध्रु० ॥
घेतलीं वल्हीं करवंटी गाडगीं घमत ओताया।
घेतले चिवे सांगातीं लांबटे ताज माराया।
बनाविली पटानें छाया रविचिया करां वाराया।
सिद्धता पूर्ण मम सारी,
आनंद मन्मनीं भारी,
शांत सागरांतिल वारी,
सोडुनी ऐल उत्साहें पैल मी निघालों जाया ॥ जल इ० ॥१॥
शीत वायु मंद गतीनें होता ह्या समयिं वहात।
दोन चार होते साने पांढरे मेघ गगनांत।
जलयानहि माझें होतें सरसरां जलांतुनि जात।
इतक्यांत मेघ मोठाले
गगनोदरिं संचित झाले,
रवितेजहि सर्व निमालें,
रौद्ररूप वायु धरोनी लागला मला भिववाया ॥ जल इ० ॥२॥
सागरोदकीं होडी ती टणटणां लागली नाचूं।
होडिच्या फळ्या पिंजोनी लागलें धमतही साचूं।

ऐल दूर पैलहि ठेला, भय मला लागलें डाचूं ।
वायुवेग झाला प्रबल,
मम यत्नाहि झाले विफल,
वर्षलें व्योम मेघजल,
उलटली मच्छिरीं होडी, लागलों गटकळ्या खाया ॥ ३ ॥
भोक्तृत्व संपलें माझें नोव्हतें, यम कसा यावा ?
मम दिलें काष्ठ हातांत, उगविला यमानें दावा,
काष्ठ तें धरुनि मी तीरा मम आलों परतुनि गांवा,
तेथ काय पाहे नयन ?
भस्मरूप माझें सदन,
मृत सगळे आप्त स्वजन,
विकल मी हिंडतों वेडा शांतिची मिळाया छाया ॥ ४ ॥

---

## ७४. जगाचा ऊरफाटा न्याय

( ' बिकट वाट ' या चालीवर )

न्याय जगाचा उकलेना जरि पंडित मोठे खटपटती ।
जगीं दरवडेखोर, लुटारू, उचले, फसवे बहु असती ॥
चोर, भामटे, डकाईतही, खिसेकातरू वावरती ।
गुप्तपणें हे कार्य साधिती, जनास देती ताप अती ॥
सापडतां हें समाजपीडक दंडी त्यांना भूमिपती ।
कीं लोकांची भलत्या मार्गापासूनि असो दूर मती ॥
न्यायाची ही सरणी घाली जनसौख्यामध्यें भरती ।
सरणी गोंडस ही निःसंशय असेंच सारे बुध म्हणती ॥
परी दरवडा परदेशावरि
घालुनि पादाक्रान्त तया करि
जो खल लोकां छाळि दैत्यांपरि
त्या जग दंडि न दंड्याचि तो जरि
उरफाटा हा न्याय जगाचा अबाध चाले भूवरती ॥ १ ॥

---

## ७५. मातृभूमीच्या सुस्थितीसाठीं झटा

(" फटक्याच्या चालीवर ")

मातृभूमिला सुस्थिति याया आर्यांनो! तुम्हि यत्न करा ।
तिजसाठीं तुम्हि कष्ट कराया सिद्ध असा, मागें न सरा ।
मातृभूमिला स्वतंत्र करणें ध्येय असें मनिं नित्य धरा ।
वैयाक्तिक जे मत्सर असतिल ते सगळे संप्रति विसरा ।
मी ब्राह्मण, तो अंत्यज ऐसा अधम विवेक न चित्तिं धरा ।
कलहाचा हा समय नव्हे, हा शुभ ऐक्याचा समय खरा ।
भेद विसरुनी ऐक्य कराया सिद्ध असा हो ! करा त्वरा ।
बंधुप्रेमें कवटाळाया सर्वांना बाहू पसरा ।
मातृभूमिहितिं वाचा श्रमवा,
मातृभूमिहितिं मनही शिणवा,
मातृभूमिहितिं देहहि झिजवा,
मातृभूमिच्या साधा विभवा,
विद्याधरवच कर्तव्याच्या मार्गी तुम्हि हें सदा स्मरा ॥ १ ॥

---

## ७६. एकान्तसमर्याचे विचार

(" भूपती खरें " ह्या चालीवर )

जागृती निशीथीं मजला असतां आली ।
प्रेरिली दृष्टि मी शयनांतुन भवतालीं ॥ १ ॥
ती दर्शरात्र घनतम तम, नव्हता दीप ।
दिसलें न कांहिंही दूर न वा न समीप ॥ २ ॥
उघाडिलें सहज म्या वातायन त्या समयीं ।
लागलों बघों मी सृष्टि नभांत उडुमयी ॥ ३ ॥
रंगलों पाहुनी सृष्टि मनोज्ञ विशाल ।
मनिं विचार आले मम तेव्हां बहुसाल ॥ ४ ॥
घडविली सृष्टि ही कोणी, केव्हां, कां वा ? ।
स्रष्टा नरास कां केव्हांही न दिसावा ? ॥ ५ ॥

घडवुनी सृष्टि ही स्रष्टा कोठें लपला ।
कीं श्रमें जगाच्या कोणीं जाउनि निजला ।। ६ ।।
काळजी कां करी तो न जगाच्या विषयीं ।
कां नरा ठेवितो मरणाच्या नित्य भयीं ।। ७ ।।
कां नराकार तो पशु जगीं सोडी स्वैर ।
जे जना गांजिती नसतां कांहीं वैर ।। ८ ।।
कां नराकार तो निर्मी दैत्य जगांत ।
जे विपत्ति अगणित सुजना भोगवितात ।। ९ ।।
सर्वही लेकरें स्रष्ट्याला सम असतां ।
कां नरा नरें तो भोगवि खरदुःखशता ।। १० ।।
थोर हें गूढ तें विद्याधर उकलाया ।
शकतो न, कुंठतो, तच्छ्रम जाती वाया ।। ११ ।।

---

## ७७ आहे ती स्थिति

( " चंद्रकांत राजाची " ह्या चालीवर )

आहे ती स्थिति नरा नावडे हें बघतों बहुधा ।
अतृप्तिचें ह्या कोडें नुकलें कोणाही विबुधा ।। ध्रु० ।।
उन्हाळ्यामधें अंग तापतां जन हुश हाय करी ।
पर्जन्याचा काळ यो अशी इच्छा चित्तिं धरी ।। १ ।।
पर्जन्यानें दाट चिखल तो भूमितलास भरी ।
तेव्हां अडकुनि तया बसावें लागे नित्य घरीं ।। २ ।।
त्रासून म्हणे बरें होय हा काळ सरेल तरी ।
येइ हिंवाळा तोहि वाटतो त्याला जेंवि अरी ।। ३ ।।
काकडला तो शीतें म्हणतो ही स्थिति नाहिं बरी ।
सरो हिंवाळा, येउ उन्हाळा हा मग काम धरी ।। ४ ।।
आतुरतेनें स्थिती इच्छिली झाली प्राप्त तरी ।
कंटाळुनि तो पालट इच्छी, गोष्ट विचित्र खरी ।। ५ ।।

आहे ती स्थिति सुखद भावुनी निज कर्तव्य करा ।
हा विद्याधर बोध करी तो चित्तीं नित्य धरा ॥ ६ ॥

---

## ७८. पंचपक्कान्नी जेवण

( ' भाव धरा रे! ' या चालीवर )

मज दैवानें । भोजना बाहिलें मानें ॥ ध्रु० ॥

नेसुनि पीतांबर जरतारी,
चांदीची करिं घेउनि झारी,
दैवाच्या मी शिरुनि अगारीं
बसलों स्थानीं । दाविलें मजसि जें त्यानें ॥ ध्रु० ॥ १ ॥

रांगोळीची महिरप सुंदर,
आंत पान पक्कान्नें त्यावर,
घ्राणा स्वाद तयांचा सुखकर,
जठरीं केलें । मी उपस्तरण पाण्यानें ॥ ध्रु० ॥ २ ॥

खाल्लीं खाद्यें मी अति रुचकर,
त्यांणीं भरलें आकंठ जठर,
केलें अपिधान जलें त्यांवर,
मग मी नेलों । आंचवायास यजमानें ॥ ध्रु० ॥ ३ ॥

हात धुउनि मीं भरिली चूळ,
जातां मुखिं गोमूत्र मचूळ,
झाली भडभड वांति गढूळ,
दावुनि आशा । फसविलें मला दैवानें ॥ ध्रु० ॥ ४ ॥

---

## ७९ उपकारशीलता

( " भूपती खरे ते " ह्या चालीवर " )

उपकारशीलता नुरली आज जगांत ।
जो विपन्न त्याला न कुणी देई हात ॥ ध्रु० ॥

जो पदोपदीं धन वेचूं सिद्ध असेल ।
त्याचियाच काजा लोक उभा ठाकेल ॥
जो दरिद्र यास्तव धन न शके वेचाया ।
तो निराश होउनि बसतो बसल्या ठायां ॥
ही सुधारणा न जगाची वाटते ।
बघुनि ती हृदय हें माझें फाटतें ।
तीमुळें होतसे नरजातीचा पात ।
घसरतो तीमुळें नर हा पशुवर्गात ।
उपकारशीलता इ० ॥ १ ॥
अल्पही काम जें सुलभ कराया असतें ।
त्यासही लागतें धन, त्याविण तें नडतें ॥
बंधुता लोपली, शब्दांताचि उरली ती ।
साहाय्य कोणिही कोणासाहि न करीती ॥
श्रेष्ठ पूर्व संघटना ती लोपली।
स्वार्थ लोभमूलक पाहों हो बळी ॥
नोव्हती रीति ही पूर्वांच्या आर्यांत ।
बंधुता नांदली तेव्हां अन्योन्यांत ॥
उपकारशीलता इ० ॥ २ ॥
लागतो आज हा उठतां बसतां पैसा ।
संघ हा टिकावा आर्यांचा तरि कैसा ? ॥
यापार वाढला सर्व जगांत विशाल ।
घेरिलें तयानें सर्व जना बहुसाल ॥
द्रव्य हीच इच्छा सर्वां लागली ।
लोपली बंधुता सारी मागली ॥
प्रीति आप्तत्व हे ध्वनि ऐकों शब्दांत ।
वस्तु त्या विलसती खसुमापरि गगनांत ॥
उपकारशीलता इ० ॥ ३ ॥
व्यक्तिचा व्यक्तिशीं व्यापारी तत्त्वानें।
व्यवहार चालतो, बंधुप्रेम न माने ॥

पाश्चात्य संस्कृती प्रेमाची संघटना ।
लोपवी, प्राच्य ती ये न कुणाच्याहि मना ॥
व्यक्तिला व्यक्तिशीं द्रव्य जोडितें ।
द्रव्य हें बंधुता सारी खोडितें ॥
पौरस्त्य संस्कृती नांदावी भुवनांत ।
ही स्पृहा बाळगी विद्याधर हृदयांत ॥
उपकारशीलता इ० ॥ ४ ॥

---

## ८०. आरशावर चोंच आपटणाऱ्या चिमणीला

( ' उद्धवा शांतवन ' ह्या चालीवर )

तूं मला मूर्खशी गमसी, बाइ गे ! व्यर्थ कां श्रमसी ? ॥ ध्रु० ॥
ती सत्य नव्हे गे ! चिमणी, प्रतिबिंब तुला तें दिसतें ।
रूप तें तुझेंच असे गे ! पाडितें भुरळ केवळ तें ।
आभास जाण तो आहे, व्यर्थ तुझी बुद्धी भ्रमते ।
आघात चंचुचे वायां करूं नको आशावरते ।
सहचरी तुला न मिळेल,
चोंच ही तुझीच फुटेल,
लोक सर्व तुज हासेल,
काळ नको येथें दवडूं भक्ष्यार्थ इथुनि जाच कशी
तूं मला इ० ॥ १ ॥
पाखरूं तूं, तुला बुद्धी देवानें नाहीं दिधली,
आरशांतल्या बाई गे! आभासा तव मति फसली,
नर आम्ही फसतों तुजसे बुद्धीनें तुजहून बली,
झटतों न आर्यभूसाठीं जी दुःखीं रडतें रुतली

स्वार्थांच्या पळतों पाठीं,
कष्टतों धनाचे साठीं,
बांधितों पातकें गाठीं,
नर आम्ही चिमणूबाई ! तुजसमान गमतों मजसी
तूं मला इ० ॥ २ ॥

---

## ८१. ताईला बोलवा

सौ० सरस्वतीबाई भिडे

( ' केलिस अशि काय परीक्षा ? ' ह्या चालीवर )

मुलगा,—" ताईला कोणी तरि येथ बोलवा ।
तिजवांचुनि मज न रुचे खाउ खेळ वा ॥ ध्रु० ॥
केला अम्हि झाडांस्तव येथ कालवा,
कुंजामधिं पक्ष्यांच्या ऐकिलें रवा,
शीतळ अम्हि बागेंतिल सेविली हवा.
न फुलांचा तीजवीण गोड ताटवा ॥ १ ॥
कोणितरी मधुर तिची मूर्ति दाखवा,
कोणितरी गोड तिचे बोल ऐकवा,
कोणितरी तत्संगतिसौख्य चाखवा,
येइल ती प्रिय ताई येथ केधवां ? " ॥ २ ॥

आई,—" देवाच्या गृहिं गेली ताई ती मुला !
भेटेल न पुनरपि ती बालका ! तुला,
न धरीं मनिं तत्संगतिलाभहेतुला,
विसर तिला, विसर तिच्या संगवैभवा " ॥ ३ ॥

मुलगा,—" जोडीनें सर्व सुखें गोड लागतीं,
मी खेळामाजि कशी रंगवूं मती ?
येइ जर न पुनरपि मम ताइ येथ ती
प्रीति अधिक दाविलि कां तिज न तेधवां ! ॥ ४ ॥

---

## ८२. आपलें सत्य स्वरूप

सौ० सरस्वतीबाई भिडे

( " तूं टाक चिरुनि ही मान " ह्या चालीवर )

दे टाकुनि जीवपणास । लहे मोक्षास
गुरुवचनिं ठेव विश्वास । व्हावया सच्चिद्धन तूं खास
मायेनें कशिली कास,
निर्मिलें पंच भूतांस,
दाविलें वरुनि विश्वास,
जो ब्रह्माण्डाचा स्वामि जाणिना । कुणी मुळीं हो ! त्यास
दे टाकुनि० ॥ १ ॥
गुरुपदीं शरण तूं जाई,
द्वैतास सोडुनी देई,
ब्रह्मरूप अवघें पाहीं,
मग बद्धमुक्तता जाचिल तुज नच । जाइल ती विलयास ।
दे टाकुनि० ॥ २ ॥
क्षेत्रज्ञ मुक्त तो असुनी
मीपणा हृदयें हो धरुनीं
गढलासी आप्तस्वजनीं
बा ! व्यर्थ व्यर्थ मुकलास तुझ्या त्या । सत्य सुखद रूपास
दे टाकुनि इ० ॥ ३ ॥
नरतनू मुक्तिचें द्वार,
नच मिळल वारंवार,
घे शोधुनि त्यांतिल सार,
ही गंगातनया वदे सत्य त्या । अवधारीं बोलास
दे टाकुनि जीवपणास ॥ ४ ॥

समा

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा.क्र. 3732
633
REFBK-0003732
REFBK-0003732

त्यांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. नंतर मुख्य ग्रंथांत ६१ अर्थालंकारांचें निरूपण केलें आहे. प्रत्येक अलंकाराचें लक्षण, लक्षणाच्या स्पष्टीकरणार्थ भरपूर उदाहरणें, प्रत्येक उदाहरणाचा अनुवाद आणि समन्वय, ह्या गोष्टी दिल्या आहेत. प्रत्येक अलंकाराचें निरूपण संपल्यावर विद्यार्थ्याला स्वतःच्या बुद्धीनें अलंकार ठरविण्यासाठीं कांहीं पद्यें दिलीं आहेत. ह्या ६१ अलंकारांचें निरूपण अशा रीतीनें समाप्त झाल्यावर चार परिशिष्टें दिलीं आहेत. त्यांत आणखी आठ दहा अर्थालंकार, कोटी, इंग्रजी अलंकार, वगैरेंची त्रोटक माहिती दिली आहे. नंतर सुमारें १५० पद्यें विद्यार्थ्यानें स्वतः अलंकार ठरविण्यासाठीं दिलीं आहेत, आणि शेवटीं सर्व पद्यांची एक वर्णानुक्रमानें सूचि दिली आहे.

ह्या पुस्तकाचा उपयोग इंग्रजी आणि मराठी शाळा आणि कॉलेजें ह्यांतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना होण्याजोगा असून शिवाय जे कोणी स्वतःच्या परिश्रमानें ज्ञानार्जन करूं इच्छिणारे लोक असतील, त्यांना हें पुस्तक उपयोगी पडेल. किंमत एक रुपया.

**९ मराठी शब्दांचें उद्घाटन**—मराठी शब्दांच्या अभ्यासापासून कशी मूल्यवान् माहिती मिळवितां येते, हें ह्यांत सांगितलें आहे. किंमत आठ आणे.

**१० म्हणींविषयीं चार शब्द**—ह्या निबंधाची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति असून तिच्या आठ प्रकरणांत म्हणींची व्याख्या, म्हणींचीं रूपें, म्हणींचे आवश्यक व अनावश्यक गुण, म्हणींतील अलंकार, म्हणींपासून मिळणारी मूल्यवान् माहिती, म्हणींची उन्नति आणि अवनति, म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें यांच्यांतील फरक, इ० विषयांची मनोरंजक रीतीनें फोड केलेली आहे. पृष्ठ-संख्या ७८. किंमत चार आणे.

**११ मुरारि अथवा शिवाजीची एक प्राथमिक मोहिम**—" महाराष्ट्रसाहित्य-सेवक-ग्रंथमाले " चें हें आठवें पुष्प असून हिंदुसंघटन व मुसलमानांचें अत्याचार या चालू प्रश्नांचें प्रतिबिंब तीनशें वर्षांपूर्वीच्या या शिवकालीन कादंबरींत मोठ्या चटकदार रीतीनें पडलेलें व रंगविलेलें वाचकांना दिसणार आहे. किंमत २ रु.

**१२ केंजळगडाचा कबजा**—ही कादंबरी दोनशें पृष्ठांची असून रहस्यपूर्ण आहे. किंमत १ रुपाया.

**१३ पण तिसरा कोण ?**—ही सुमारें ४०० पृष्ठांची अत्यंत विविध रहस्यांनीं परिप्लुत आणि अतिशय मनोरंजक अशी कादंबरी आहे. शिवाजीनें